



रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ४८
www.ramprahar.com

रविवार, ३ सप्टेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



अंतरंग

महानिर्मितीचा बोर्गी सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित/२

'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४

मुरूड तालुकास्तरीय शालेय पावसाळी क्रीडा स्पर्धा/८


# आदित्य यानाचे यशस्वी प्रक्षेपण

## 'इस्रो'ची आणखी एक गगनभरारी



**श्रीहरिकोटा : वृत्तसंस्था**

**यशस्वी चांद्रयान मोहिमेनंतर भारताचे आदित्य एल१ यान शनिवारी (दि. २) सूर्याच्या दिशेने झेपावले. इस्रो अर्थात भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या या नव्या मोहिमेमुळे सूर्याचा अभ्यास करणे शक्य होणार आहे.**

> **चांद्रयान-३च्या यशानंतर आदित्य एल१ या इस्रोच्या पहिल्या सौर मोहिमेच्या यशस्वी प्रक्षेपणासाठी शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांचे अभिनंदन! संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाकरिता आमचे अथक वैज्ञानिक प्रयत्न सुरूच राहतील.**
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून पीएसएलव्ही रॉकेटच्या सहाय्याने सकाळी ११ वाजून ५० मिनिटांनी आदित्य या सूर्ययानाचे यशस्वीरित्या प्रक्षेपण करण्यात आले. यानंतर संपूर्ण भारतात जल्लोष करण्यात आला. या वेळी सतीश धवन अवकाश केंद्रात मोठ्या संख्येने जमलेल्या लोकांनी भारत 'माता की जय'च्या घोषणा दिल्या. संपूर्ण देशभरातून इस्रोच्या या कामगिरीचे कौतुक केले जात आहे.

इस्रोची ही पहिलीच सूर्य मोहीम आहे. आदित्य यान पाच टप्प्यांमध्ये सूर्याचा प्रवास करणार आहे. पीएसएसव्ही रॉकेटच्या माध्यमातून हे यान पृथ्वीच्या खालच्या कक्षेत प्रस्थापित करण्यात येईल. त्यानंतर हे यान पृथ्वीच्या कक्षेतच फिरणार आहे. दुसऱ्या टप्प्यात हे यान पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या बाहेर काढण्यात येईल. तिसऱ्या टप्प्यात या यानाचा सूर्याच्या दिशेने प्रवास सुरू होईल. चौथ्या टप्प्यात हे यान लॅग्रेंज बिंदूच्या कक्षेत प्रस्थापित करण्यात येईल आणि पाचव्या टप्प्यात हे यान सूर्याचा अभ्यास करण्यास सुरुवात करेल.

या संपूर्ण प्रक्रियेस जवळपास चार महिन्यांचा कालावधी लागणार असून पुढील पाच वर्षांसाठी हे यान सूर्याचा अभ्यास करणार आहे. सूर्यामधील अनेक रहस्यांचा उलगडा करण्यास हे यान इस्रोला मदत करेल.

# हिंसाचार, जाळपोळ थांबवा; राज्य शासन चर्चेला तयार!

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे आंदोलकांना आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील अंतरवली येथे आंदोलन करणाऱ्या समाजबांधवांवर पोलिसांकडून झालेला लाठीमार, हवेतील गोळीबार, बळाच्या गैरवापरासंबंधी उच्चस्तरीय चौकशीचे आणि दोषी पोलिसांवर कठोर कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे मराठा समाजाच्या नेत्यांसोबत चर्चा करून या प्रश्नी तोडगा काढण्याची राज्य सरकारची तयारी असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले की, जालन्यातील घटनेबाबत मराठा बांधवांसह सर्व महाराष्ट्रवासीयांच्या भावना तीव्र आहेत. राज्य शासनदेखील या भावनांशी सहमत असून शासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यामुळे राज्याच्या काही भागात बसगाड्यांवर दगडफेक, जाळपोळ, हिंसाचाराच्या ज्या घटना होत आहेत त्या तातडीने थांबवण्याची गरज आहे.

आजपर्यंत शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने सुरू असलेले आंदोलन यापुढेही त्याच मार्गाने पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. मी मराठा समाज बांधवांना, मराठा संघटनांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आवाहन करतो की, राज्याच्या काही भागात सुरू असलेला हिंसाचार थांबवण्यासाठी आपण पुढे यावे. राज्याच्या साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही तसेच आंदोलनामुळे आपल्या माता-भगिनींच्या, बांधवांच्या जीवाला धोका होणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

लाठीमार घटनेसंदर्भात चर्चा करून मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाची तयारी आहे. राज्यात शांतता, कायदा-सुव्यवस्था कायम राहिल यासाठी आपण सर्वांनी सहकार्य, प्रयत्न करूया, असेही उपमुख्यमंत्र्यांनी म्हटलेय.

### मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका -मुख्यमंत्री

**मुंबई :** मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे ही भूमिका राज्य शासनाची आहे. आंदोलकांवर झालेल्या लाठीमाराच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल. नागरिकांनी शांतता राखावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमाराची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेची जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांकडून माहिती घेतली आहे. या आंदोलनाच्या नेत्यांशीही संवाद साधला होता. त्यांच्या मुद्द्यांवर अधिकाऱ्यांकडून युद्धपातळीवर कार्यवाही सुरू असल्याचे सांगतानाच त्यांना आंदोलन मागे घेण्याची विनंती केली होती, मात्र आंदोलनावर ते ठाम राहिल्याने त्यांची प्रकृती खालावत होती. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक त्यांना भेटायला गेले होते. त्यांची प्रकृती पाहून त्यांना रुग्णालयात दाखल होण्यासाठी विनंतीदेखील त्यांनी केली होती. मराठा समाजाला आरक्षण देण्याची प्रामाणिक भावना राज्य सरकारची आहे. नागरिकांनी शांतता राखावी.

# राज्यातील १०८ शिक्षकांना क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले गुणगौरव पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**


सन २०२२-२३च्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी शासनाने शालेय शिक्षण स्तरावर प्रवर्गनिहाय १०८ शिक्षकांची निवड केली आहे. या शिक्षकांना ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमात गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झालेल्या सर्व शिक्षकांचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी अभिनंदन केले आहे.

### मुंबईत शिक्षक दिनी पुरस्कार वितरण सोहळा

समाजाची निःस्वार्थ भावनेने, निष्ठेने सेवा करणाऱ्या आणि शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन देण्याच्या व त्यांच्या गुणांचा यथोचित सन्मान करण्याच्या उद्देशाने राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात येतात. सन २०२१-२२पासून राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराचे निकष सुधारित करून हे पुरस्कार क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार या नावाने देण्यात येत आहेत.

सन २०२२-२३च्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासाठी शिक्षकांची अंतिम निवड करण्यासाठी दिनांक २५ ऑगस्ट रोजी राज्य निवड समितीची ऑनलाईन बैठक झाली. राज्य निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्राथमिक प्रवर्गात ३७, माध्यमिक प्रवर्गात ३९, आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे शिक्षक (प्राथमिक) १९, थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार आठ, विशेष शिक्षक कला, क्रीडा दोन, दिव्यांग शिक्षक, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शाळेतील शिक्षक एक आणि स्काऊट गाइडसाठी दोन असे एकूण १०८ पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. याबाबतचा शासन निर्णय १ सप्टेंबर रोजी जारी करण्यात आला आहे.

# वरुणराजाची हजेरी



### शेतकऱ्यांसह साऱ्यांनाच दिलासा

**अलिबाग : प्रतिनिधी**

ऑगस्ट महिन्यात गायब झालेला पाऊस पुन्हा एकदा परतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हायसे वाटले असून उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

संपूर्ण ऑगस्ट कोरडा गेल्याने शेतकरी आणि नागरिक चिंताग्रस्त झाले होते. पावसात खंड पडल्याने शेतीला धोका निर्माण झाला होता. अनेक क्षेत्रावरील पिके नष्ट झाली आहेत. उर्वरित पिके टिकविण्यासाठी पावसाची नितांत गरज आहे, तर दुसरीकडे जलाशयांतील साठा कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याचीही समस्या गंभीर होण्याची चिन्हे आहेत. अशातच पावसाचे पुनरागमन झाल्याने दिलासा मिळाला आहे.


## निवडक

### राजस्थानमध्ये विवाहितेची सासरच्यांकडून विवस्त्र धिंड

**जयपूर :** विवाहित महिलेचे दुसऱ्या पुरुषाशी प्रेमसंबंध होते आणि ती त्याच्या घरी राहात होती म्हणून तिची पती आणि सासरच्यांकडून विवस्त्र धिंड काढण्यात आल्याचा प्रकार राजस्थानमधील प्रतापगड जिल्ह्यात समोर आला आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पीडित २१ वर्षीय आदिवासी महिला गर्भवती आहे. या प्रकरणी आरोपी पतीसह अन्य आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

### उदय कोटक यांचा एमडी आणि सीईओपदाचा राजीनामा

**मुंबई :** उदय कोटक यांनी कोटक महिंद्रा बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक (एमडी) आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)पदाचा राजीनामा दिला आहे. बँकेने शेअर बाजारांना पाठवलेल्या अधिसूचनेत ही माहिती दिली. अंतरिम व्यवस्थेनुसार उदय कोटक यांच्या जागी सहव्यवस्थापकीय संचालक दीपक गुप्ता ३१ डिसेंबरपर्यंत बँकेची जबाबदारी सांभाळतील.


# खोपोलीत अनेक घरांमध्ये शिरले पाणी

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

सह्याद्री पर्वतरांगा व खोपोली परिसरात रात्रभर मुसळधार पाऊस पडल्याने शहरातील भानवज, शीळफाटा व अन्य सखल भागांत मोठ्या प्रमाणावर पाणी भरले. अनेक बैठ्या घरांतही पावसाचे पाणी शिरल्याने एकच तारांबळ उडाली.

खोपोलीत मोगलवाडी रोड, भानवज कारमेल स्कूल, शीळफाटा परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी भरले होते. त्यात रात्री ३ वाजण्याच्या सुमारास खंडित झालेला वीजपुरवठा दुसरा दिवस उजाडला तरी पूर्ववत न झाल्याने मदतकार्य करण्यात सामाजिक कार्यकर्ते व पालिका यंत्रणेला अडचणींचा सामना करावा लागला. अनेक बैठ्या घरांत लोक रात्रभर अडकून पडले होते.

याची दखल तहसीलदार आयुब तांबोळी, पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी घेतली व मदतीसाठी सूत्रे हलविली. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सक्रिय सामाजिक कार्यकर्ते, माजी नगरसेवक राजू गायकवाड व अन्य स्थानिक तरुणांनी मदतकार्य करीत अडकलेल्या कुटुंबांना बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी आणले. सुदैवाने या पावसात जीवित हानी झाली नाही.

# ठाकरे गटाचे पदाधिकारी भाजपमध्ये दाखल

## मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याकडून स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळवून देण्याची भूमिका तसेच राज्यात होत असलेल्या सर्वांगीण विकासावर प्रभावित होऊन विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल होत आले. अशाच प्रकारे रत्नागिरी जिल्ह्यातील देवरूख येथील ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि. २) विकासाचे 'कमळ' हाती घेतले. पनवेलमधील भाजपच्या तालुका आणि शहर मध्यवर्ती कार्यालयात हा पक्षप्रवेश झाला.

या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, संगमेश्वर चिपळूण संपर्क प्रमुख प्रमोद अडतराव, रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष राजेश सावंत, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष अभिजीत शेट्ये, भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, ज्योती देशमाने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी ठाकरे गटाचे मनीष सावंत, राकेश महाडिक, सुबोध लोध, केतन ब्रिद, पंकज मांगवे, अनुल यादव, पृथ्वीराज यादव, युवराज महाडिक, संजय लिंगायत, अजय लिंगायत, विकास खांबे, गोविंद राठोड, समीर कदम, मिथुन बारगुडे, रोहन कदम, यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. मंत्री रवींद्र चव्हाण यांनी प्रवेशकर्त्यांचे पक्षाची शाल देऊन भाजपमध्ये स्वागत केले तसेच जो विश्वास ठेवून तुम्ही प्रवेश केला आहे तो सार्थ होईल, असे प्रतिपादन केले.

# आमदार महेश बालदी यांच्या हस्ते चिंचवणमध्ये रस्ता, बसथांब्याचे उद्घाटन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या निधीतून पनवेल तालुक्यातील आणि उरण विधानसभा मतदारसंघातील चिंचवण येथे रस्ता आणि बसथांबा निवारा शेडचे उद्घाटन तसेच वनविभागाच्या वतीने महिला बचत गटांना साहित्याचे वाटप शनिवारी (दि. २) करण्यात आले. आमदार महेश बालदी यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला.

### महिला बचत गटांना साहित्यवाटप

या कार्यक्रमास भाजप केळवणे जि.प.विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सांगुर्ली ग्रामपंचायतीच्या सरपंच पद्माकर कातकरी, प्रितेश मुकादम, माजी सरपंच दत्तात्रेय हातमोडे, नांदगावचे माजी सरपंच अविनाश गायकर, सदस्य विजय भोपी, शरद वांगीलकर, विष्णू ठोकळ, संतोष पारधी, पांडुरंग गायकर, मिनल चोरघे, वन विभाग अधिकारी राठोड, युवा नेता निलेश वांगीलकर, निलेश हातमोडे, अनिल वांगीलकर, संतोष वाजेकर, सुनील गवंडी, सुवर्णा पाटील, केशव ठोंबरे, परशुराम पाटील, सुनील म्हस्कर, गजानन ठोंबरे, भास्कर पाटील, मोहन पाटील, पंढरीनाथ ठोंबरे, संजय पोपेटा, अनंता पोपेटा, अमित पाटील, नितेश पाटील, विवेक भोईर, बळीराम भोईर, भाया भोईर, जगदीश पाटील, प्रतिक म्हसकर, राजा भोईर, गोपाळ भोईर, चंद्रकांत पाटील, चंद्रकांत ठोंबरे, विकास ठोंबरे, भास्कर लेंडे, परेश ठोंबरे, एकनाथ कातकरी, बाळू लेंडे, बाबुराव लेंडे, बळीराम पाटील, नारायण पाटील, घे भरारी महिला ग्रामसंघाचे सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रेमसंबंधाच्या कारणावरून पत्नीची हत्या; पतीला अटक

**माणगाव : प्रतिनिधी**

दुसऱ्या माणसाबरोबर प्रेमसंबंध असल्याच्या कारणावरून पतीने पत्नीची हत्या केल्याची घटना माणगाव तालुक्यातील इंदापूर गावच्या हद्दीत गोड नदीवरील रेल्वेपुलावर शुक्रवारी (दि.१) रात्री घडली. प्रकरणी पतीला माणगाव पोलिसांनी अटक केली आहे.

घटनेतील आरोपी गणेश रमेश चव्हाण (वय ३६, रा. इंदापूर, ता. माणगाव) याने त्याची पत्नी शारदा (वय ३५) हिचे दुसऱ्या माणसाबरोबर प्रेमसंबंध आहेत असे समजल्यावर त्या रागात तिच्या हात, पाय व छातीवर काठीने मारून गंभीर दुखापत केली व नंतर तिचे डोके रेल्वे सिमेंट स्टोनवर आपटून हत्या केली. मग प्रेत नदीकिनारी टाकून पहिली पत्नी शेवंता वाघमारे व तिच्या नातेवाईकांनी शारदाची हत्या केली अशी खोटी माहिती पोलीस कंट्रोल रूमला फोन करून गणेशने दिली. या घटनेची माहिती समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कुमार पोंदकुळे, निरीक्षक राजेंद्र पाटील, सहाय्यक निरीक्षक एस. अस्वर, उपनिरीक्षक श्री. भोजकर यांनी घटनास्थळी भेट दिली. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.

# रायगड कार्यक्षेत्रात जड-अवजड वाहतूकबंदी अधिसूचना जारी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कार्यक्षेत्रातील पोलादपूर, महाड, माणगावमार्गे पनवेलकडे येणारी मुंबई-गोवा महामार्ग क्रमांक ६६वरील जड-अवजड वाहनांची वाहतूक ही वाकण फाटा, पाली-खोपोली फाटामार्गे मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग व एनएच ०४ (पनवेल-खोपोली जुना महामार्ग) या मार्गावरून वळविण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केले असून ते २८ सप्टेंबरपर्यंत लागू राहणार आहेत.

सद्यःस्थितीत जिल्ह्यात सुरू असलेली पर्जन्यवृष्टी, मुंबई-गोवा महामार्गावरील दुरूस्तीचे कामकाज व येत्या काही दिवसांत साजरा होणारा गणेशोत्सव यामुळे या महामार्गाचे दुरुस्तीचे काम होणे आवश्यक आहे. त्यामुळे या महामार्गावरील पोलादपूर महाड, माणगावमार्गे पनवेलकडे होणारी जड-अवजड वाहनांची वाहतूक बंद करून जड-अवजड वाहनांची वाहतूक वाकण फाटा, पाली-खोपोली फाटामार्गे मुंबई-पुणे द्रुतगतीमार्ग किंवा एनएच ०४ (पनवेल-खोपोली जुना महामार्ग)मार्गे वळविणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी दिलेला आहे. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची खात्री झाल्यानंतर त्यांनी हे आदेश जारी केले आहेत.

# आदित्य एल-१च्या यशस्वी प्रक्षेपणाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून अभिनंदन

## मोहिमेत पुण्यातील 'आयुका'चा सहभाग अभिमानास्पद



**मुंबई : प्रतिनिधी**

चांद्रयान-३च्या यशस्वी मोहिमेतून भारताने चंद्रावर तिरंगा फडकवला आहे. आता सौर मोहिमेतील आदित्य एल-१ हे पहिलेच सूर्ययान सूर्याच्या अभ्यासासाठी यशस्विरित्या प्रक्षेपण करून भारताने अवकाश संशोधनाच्या इतिहासात सुवर्णअक्षरांत नोंद करून ठेवावी, अशी कामगिरी केली आहे. या यशासाठी 'इस्त्रो' या आपल्या अवकाश संशोधन संस्थेचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूर्याच्या संशोधनातील भारताच्या भरारीचे कौतुक केले आहे.

या मिशनमध्ये पुण्यातील आयुका संस्थेचा उपग्रहावरील संशोधन उपकरण निर्मितीत सक्रिय सहभाग अभिमानास्पद असल्याचा उल्लेखही मुख्यमंत्र्यांनी केला आहे.

अभिनंदन संदेशात मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटले आहे की, चंद्रयान-३च्या यशस्वी मोहिमेमुळे भारताचे अवकाश संशोधनातील स्थान बळकट झाले आहे. भारत जगातील असा चौथा देश ठरला आहे. चंद्रावरील दक्षिण ध्रुवावर प्रग्यान हे रोव्हर उतरवून भारताने विक्रमच केला आहे. पाठोपाठ आपण सूर्याच्या संशोधनाच्या दृष्टीने आज आणखी एक मोठी झेप घेतली आहे. आदित्य एल-१ या पहिल्याच सूर्ययानाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे आता भारत चंद्र आणि सुर्य संशोधनात कामगिरी करणारा आणि त्यामध्ये सातत्य राखणारा जगाच्या दृष्टीने महत्वाचा देश ठरला आहे. या संशोधनातील निष्कर्षातून केवळ भारतच नव्हे, तर जगातील मानवजातीच्या हितासाठी पावले उचलता येणार आहेत. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश असणाऱ्या आपल्या भारताची या दोन्ही मोहिमांतून वैज्ञानिकदृष्ट्या बलाढ्य असा देश अशी ओळख निर्माण झाली आहे. आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पाठबळामुळे आणि त्यांच्या प्रोत्साहनामुळे चंद्रयान-२च्या एका अपयशातून बाहेर पडून इस्त्रोने ही मोठी भरारी घेतली आहे. यापुढेही इस्त्रोची कामगिरी अशीच उंचावणारी राहील, असा विश्वास आहे. इस्त्रोच्या या कामगिरीला तोड नाही. या मोहिमेत सहभागी सर्व संशोधक-वैज्ञानिक, अभियंते आदींचे अभिनंदन, असेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले आहे.

### अवकाश संशोधन क्षेत्रात महासत्ता बनण्याच्या दिशेने भारताची वाटचाल -उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई** : चंद्रयान-३ च्या यशस्वी स्वारीनंतर सौर मोहिमेतील आदित्य एल-१ हे भारताचे पहिले सूर्ययान सूर्याच्या दिशेने यशस्वीपणे झेपावले. यशस्वी चंद्र मोहिमेनंतर अवकाश संशोधन क्षेत्रातील जागतिक सत्ता बनलेल्या भारताने आज अवकाश महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले आहेत.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, चांद्रयान आणि आता सूर्ययानाच्या माध्यमातून भारतीय अवकाश संशोधन संस्थेने आपल्या देशाला अवकाश संशोधन क्षेत्रात जागतिक ओळख, वलय, विश्वास मिळवून दिला आहे. यापुढेदेखील अनेक अवकाश मोहिमा राबवून देशाच्या, जगाच्या संशोधन क्षेत्राच्या विकासात मोठी भर घालण्यात आपण यशस्वी होऊ.

भारताच्या या गौरवशाली वाटचालीत योगदान देणाऱ्या सर्व आजी-माजी वैज्ञानिक, तंत्रज्ञ, अभियंता, अधिकारी-कर्मचारी आणि समस्त भारतीयांचे उपमुख्यमंत्री पवार यांनी अभिनंदन केले आहे.

## पुण्यात गणेश मंडळांसाठी नियमावली जाहीर

**पुणे** : पुण्यात गणेशोत्सवाची जोरदार तयारी सुरु झाली आहे. गणेश मंडळांना महापालिकेकडून नियम घालून देण्यात आले आहेत. त्यात मूर्तीची उंची, उत्सव मंडपाची उंची आणि इतर काही बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

मागील वर्षांपासून पुढील पाच वर्षाच्या कालावधीकरिता २०१९चे सालामध्ये देण्यात आलेल्या उत्सव मंडप, स्वागत कमानी आणि रनिंग मंडप इत्यादींच्या परवानग्या ग्राह्य धरण्यात येणार आहे.


### जाहीर नोटीस

भुखंडाचे वर्णन

| मौजे | सिडको फाईल नं. | सेक्टर क्र. | भुखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| उलवे नोड | उलवे १९५५ | १५ A | २५ | ८४९.९९ चौ. मी. |

तमाम लोंकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, माझे आशिल मे. वृंदावन लाइफस्पेसेस तर्फे भागीदार १. श्री. शिवजी अंबा गामी, २. श्री. धनजी मंदन पटेल, ३. श्री. हिरा हरी वावीया व ४. श्री. धरमेश कानजी पटेल कार्यालयीन पत्ता गाळा क्र. १०, नवी मुंबई मर्चंट चेंबर, प्लॉट नं. १४, सेक्टर क. १९, वाशी, नवी मुंबई, ४०० ७०३ यांनी सिडको कडील १२.५ टक्के गावठाण विस्तार योजने अंर्तगत मुळ शेतकरी/जमीन मालक **१) कै. आंजेल ॲथोनी पाटील उर्फ मच्याडो (मयत) तर्फे वारस** १/१. श्री. ज्युलियस आंजेल मच्याडो, १/२ श्री. डॉमनिक आंजेल मच्याडो, १/३. श्री. मायकल आंजेल मच्याडो, १/४ एडिना विश्वनाथ मच्याडो, **१/५. कै. मोनिक पास्कोल कार्लोस (मयत ) तर्फे वारस** १/५/१ श्रीमती. डिना पास्कल उर्फ पास्कोल कारलोस, १/५/२. श्रीमती. डिलॉन उर्फ डिलोन पास्कल उर्फ पास्कोल कारलोस, १/६. श्री. क्लेरा नोएल लोबो, २) श्रीमती जोसेफ अंथोन पाटील उर्फ मचाडो, ३) श्रीमती त्रिजा डोमनिक मचाडो, ४) श्री. पीटर अंतोन पाटील उर्फ मचाडो, **५) श्रीमती. अर्थलिन अंतोन पाटील उर्फ अनुसया भगवान पाटील (मयत) तर्फे वारस** ५/१. श्री. भगवान जनार्दन पाटील, ५/२. श्री. रंजीत भगवान पाटील, **५/३. कै. गौरव भगवान पाटील (मयत) तर्फे वारस,** ५/३/१. श्रीमती. मनाली गौरव पाटील, ५/३/२. कु. रूही गौरव पाटील व ५/४. श्रीमती जागृती अमरनाथ भोईर सर्व राहणार न्हावे, तालूका पनवेल, जिल्हा रायगड यांना त्यांचे खालील संपादीत मिळकतीबाबत पात्रतेनूसार वाटप करण्यात आलेला वर नमुद भुखंड खरेदी केलेला आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

सिडको फाईल नं. १९५५

मौजे - न्हावे, तालूका - पनवेल, जिल्हा

| अवॉर्ड/ यूनीट केस क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) |
|---|---|---|---|
| न्हावे १/९४/४ | २ अ | ८९ | ०-९९-० |

तरी सदर वर नमूद संपादीत मिळकतीवर अथवा त्याच्याबदल्यात मिळनारे वर नमुद भूखंडावर अगर भूखंडाचे कोणत्याही भागावर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज, करार वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालिल सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मूदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तकार, दावा न आल्यास सदर वर नमूद संपादीत मिळकत अगर संपादीत मिळकतीबाबत मिळणारा वर नमुद भूखंड निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून माझे आशिल सदर भुखंडाचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व सदरहू भूखंड सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे आपल्या नावे हस्तांतर करून घेतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोंकानी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- ०३/०९/२०२३**

**सही/-**
**ॲड. वंदना धर्मा घरत**
**पत्ता:- शॉप नं ३, प्लॉट नं.१४ सेक्टर-१**
**नविन वरचे ओवळे, एम पी,ए.एस.सी**
**कॉलेज जवळ, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड**


## महानिर्मितीचा बोर्गी सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित



**नागपूर : प्रतिनिधी**

रात्री सिंचन करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यामुळे शेतीसाठी दिवसा भरवशाचा वीजपुरवठा व्हावा यासाठी राज्य शासनाने महत्वाकांक्षी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना सुरु केली.

या योजने अंतर्गत २ मेगावाटचा बोर्गी, तालुका जत, जिल्हा सांगली येथील सौर ऊर्जा प्रकल्प २ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजून २७ मिनिटांनी कार्यान्वित करण्यात महानिर्मितीला यश आले आहे.

या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे बोर्गी खुर्द या गावातील सुमारे ५०० कृषी वीज ग्राहकांना सौर ऊर्जेचा लाभ होऊन, विशेषतः पाच एच.पी.चे सुमारे ५२० कृषी पंप उर्जित होणार आहेत.

प्रकल्प महावितरणच्या ३३/११ के.व्ही. बोर्गी उपकेंद्राला जोडण्यात आला आहे. ४ हेक्टर शासकीय पडीक जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात आला असून, प्रकल्प उभारणीचा खर्च सुमारे आठ कोटी इतका आहे. महानिर्मिती, मेसर्स ई.ई.एस.एल. (विकासक), मेसर्स टाटा पॉवर सोलर (सब व्हेंडर) आहेत. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्याने महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ३७८.०२ मेगावाट इतकी झाली आहे. ह्या सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीत गावकऱ्यांचे, स्थानिकांचे, महाऊर्जा आणि महावितरणचे विशेष सहकार्य लाभले.

या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष २० व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. या प्रकल्पातून उत्पादित होणाऱ्या विजेकरिता रु.३.३० प्रती युनिट दराने महावितरण समवेत वीज खरेदी करार करण्यात आला आहे.

महानिर्मितीच्या दरीकोन्नूर ६.१६ मेगावाट (तालुका जत, जिल्हा सांगली) येथील सौर ऊर्जा प्रकल्पाची कामे अंतिम टप्प्यात असून लवकरच हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री तसेच प्रधान सचिव (ऊर्जा) यांचे निर्देशानुसार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अनबलगन यांच्या मार्गदर्शनाखाली महानिर्मितीच्या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प कामांना गती देण्यात येत असून महानिर्मितीचे संचालक(प्रकल्प) आणि संपूर्ण नवीकरणीय ऊर्जा चमू यासाठी विशेष परिश्रम घेत आहेत.

## विद्यार्थिनींनी बांधली पोलिसांना राखी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील कोकण एज्युकेशन इंग्लिश मीडियम इंदुबाई वाजेकर हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी पनवेल शहर पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

या वेळी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक नितीन ठाकरे, रायगड स्काउट गाइड विभागाच्या सोनाली राठोड, पोलीस कर्मचारी, स्काउटर, गाइडर उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीनमालक सौ. आरती अमित ढोले यांच्या मालकी हक्क, तावे कब्जा व वहीवाटीतील मौजे रानवड, ता. उरण, जि. रायगड येथील जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे -

जमिन मिळकतीचे वर्णन

| गावाचे नाव | गट क. व उपविभाग क. | लागवडी योग्य क्षेत्र हे. आर. प्रति. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|
| रानवड | ४/७/व | ० - १३ - ४० | ४. १२ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, विनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्कावावत/हरकतींबावतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरहु जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

सही
**धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स,
प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी.
बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८



अर्जदारा तर्फे ॲड: श्री. विनोद स. सकपाळ
ने. ता. ०९/१०/२०२३

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील श्री. के.एम.सोनावणे सो. मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. ८५१/२०२३
निशाणी: १०/ड

त्यापेक्षा मयत श्री. रामभाऊ नारायण पोरजे हे १२ ऑगस्ट २०२२ रोजी कामोठे, नवीन पनवेल येथे मयत झाले आणि अर्जदार श्री. विजय रामभाऊ पोरजे आणि श्रीमती लिलाबाई रामभाऊ पोरजे, राहणार फ्लॅट नं.१०१, बिल्डिंग नं.५, शिव सह्याद्री कॉ-ऑप. हौसिंग सोसायटी लि. स्वागत कॉम्प्लेक्स, जरी मरी माता मंदिर जवळ, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड-४१०२०६ ह्यांनी ह्या कोर्टात सदरहू मयत श्री. रामभाऊ नारायण पोरजे यांचे वारस ठरवून मिळणेकरिता वारस सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. मयत श्री. रामभाऊ नारायण पोरजे यांचे नावावर तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहे.

| तालुका खालापूर जिल्हा रायगड येथील स्थावर मिळकत | |
|---|---|
| क्र. | मिळकतीचे वर्णन |
| १. | गाव रिस, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, महाराष्ट्र येथे सर्व्हे नं.१६४, हिस्सा नं.४ आणि उपविभाग नं.अ/२, भूखंड नं.२ येथील एकूण जमीन ३ गुंठा आणि १८ आना (ULPIN:१३२०१२७५३३८). |

सदरचा वारस दाखला अर्जदार यांस मिळणेकरिता वारस सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा मयत श्री. रामभाऊ नारायण पोरजे यांचे अर्जदार वारस नव्हेत, असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार व सामनेवाला ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत श्री. रामभाऊ नारायण पोरजे यांचे वारस असल्याबाबत सर्टिफिकेट देईल.

दिनांक हे २२/०८/२०२३ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

सहाय्यक अधीक्षक,
सही/-
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीन मालक (१) श्रीमती. रमाबाई नामदेव नाईक, (२) श्री. केशव काळूराम म्हात्रे, (३) श्रीमती. लिला गणा मढवी, (४) श्रीमती. गुणाबाई महादेव ठाकूर, (५) श्रीमती. कमलाबाई चंद्रकांत ठाकूर, (६) श्री. रतन नागेश म्हात्रे, (७) श्री. सुमित वसंत म्हात्रे, (८) श्रीमती. प्रभा राजेश पाटील, (९) श्रीमती. प्रिया बाळकृष्ण ठाकूर, (१०) श्रीमती. गुलाब बाळकृष्ण ठाकूर, (११) श्रीमती. अनिता नामदेव पाटील, (१२) श्री. अनुराग नामदेव पाटील, (१३) श्रीमती. रुक्मीणी निवृत्ती गायकवाड, (१४) श्री. सुशिला एकनाथ पाटील, (१५) श्रीमती. चंद्राबाई वामन म्हात्रे, (१६) श्री. मंगेश वामन म्हात्रे, (१७) श्री. संतोष वामन म्हात्रे, (१८) श्री. विलास वामन म्हात्रे, (१९) श्री. साहिल हरिश्चंद्र पाटील, (२०) श्रीमती. सोनाली हरिश्चंद्र पाटील, (२१) श्रीमती. कांता तुकाराम गायकवाड, (२२) श्री. संदीप लहू दापोलकर, (२३) श्रीमती. निता समीर गायकवाड, (२४) श्रीमती. काशीबाई तुकाराम म्हात्रे, (२५) श्रीमती. रेखाबाई सुरेश भगत, (२६) श्री. गोपिचंद तुकाराम म्हात्रे, (२७) श्रीमती. लक्ष्मी किशोर केणी, (२८) श्री. नवनीत तुकराम म्हात्रे, (२९) श्री. काशिनाथ काळूराम म्हात्रे, (३०) श्रीमती. शंकुतला भास्कर पाटील, (३१) श्री. गिरीश भगवान म्हात्रे, (३२) श्री. संतोष भगवान म्हात्रे, (३३) श्री. किरण भगवान म्हात्रे, (३४) श्रीमती. सुरेखा जयंद्र ठाकूर, (३५) श्रीमती. दिपाली दिपक माळी, (३६) श्रीमती. संगिता किरण घरत, (३७) श्रीमती. हर्षदा हरेश म्हात्रे, (३८) श्री. अनुज महेंद्र बांठिया, (३९) श्री. आकाश महेंद्र बांठिया आणि (४०) श्री. तनुज महेंद्र बांठिया यांच्या सामाईक मालकी हक्क, तावे कब्जा व वहीवाटीतील मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकती ह्या कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे:-

जमिन मिळकतीचे वर्णन

| गावाचे नाव | गट क. व उपविभाग क. | लागवडी योग्य क्षेत्र हे. आर. प्रति | आकार |
|---|---|---|---|
| गव्हाण | ३१३/९ | ० - २५ - ३०<br>पोट खराबा ० - ०३ - ३०<br>एकुण क्षेत्र ० - २८ - ६० | २.६२ |
| | ३१८/१ | ० - ०६ - ५०<br>पोट खराबा ० - ०१ - ३०<br>एकुण क्षेत्र ० - ०७ - ८० | १.२५ |
| | ३०४/१७ | ० - ४५ - ००<br>पोट खराबा ० - ०५ - ००<br>एकुण क्षेत्र ० - ५० - ०० | १.२५ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/खरेदीखत हे आमचे अशिल आणि वर नमुद जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्बेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबावत/हरकतींबावतची सुचना त्यात हक्क/ हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा-याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरहु जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

सही
**धनंदा प्रदिप मोकल**
(वकील उच्च न्यायालय)
पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स,
प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी.
बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे
फोन नं. ९६१९५०५९५८

# बागेचीवाडीचा आदर्श सन्मान होणार

## घरकुल भूमिपूजन कार्यक्रमात आमदार महेश बालदी यांचे प्रतिपादन





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कर्तव्यदक्ष आमदार महेश बालदी यांच्या हस्ते आपटा ग्रामपंचायत अंतर्गत सारसई बागेची वाडी येथे घरकुल भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बागेची वाडीला लवकरच आदर्श वाडीचा सन्मान मिळेल, असे आमदार महेश बालदी यांनी बोलताना व्यक्त केले.

गेली तीन वर्षे सातत्याने पाठपुरावा करून याठिकाणी आदिम घरकुल योजना आणि विशेष केंद्रीय अर्थ सहाय्य योजने अंतर्गत एकूण ५४ पक्क्या घरकुलांचे निर्माण करण्यात आले. या वाडीत एकूण ५८ कुटुंब आहेत. येथील सर्व कुटुंबांचे पक्के घरकुल बांधण्याचे कार्य सुरू आहे शेवटच्या ११ घरकुल बांधकामाचे भमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते नुकतेच झाले. या वाडीला लवकरच आदर्श वाडीचा सन्मान मिळेल, अशी आमदार महेश बालदी यांनी बोलताना व्यक्त केली. त्याचप्रमाणे माडभुवन आणि घेरावाडी यांचेदेखील पुनर्वसनाचे प्रस्ताव लवकरच मंजूर होतील यासाठी मी स्वतः मंत्रालय स्तरावर जलद गतीने पाठपुरावा करित आहे असे मत यावेळी बोलताना व्यक्त केले. तसेच या वाडीमध्ये सुसज्य असे बहु उद्देशीय सभागृह बांधण्यात येईल जिल्ह्यातील इतर वाड्याना या वाडीपासून नक्कीच प्रेरणा मिळेल असा विश्वास यावेळी बोलताना व्यक्त केले. तसेच इरशावाडीतील संकल्पित आराखड्याचे प्रकाशन देखील ग्रामस्थांसमवेत करण्यात आले. ग्रामस्थांनी पाना फुलांची रस्त्यावर रांगोळी काढून माझे स्वागत केल्याबद्दल सर्व ग्रामस्थांचे आभार मानले.

या वेळी माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल तालुका भाजपचे उपाध्यक्ष विद्याधर जोशी, आपटा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्ता पाटील, ज्ञानेश्वर भोईर, कराडे खूर्द माजी सरपंच विजय मिरकुटे, साईचे माजी सरपंच विद्या मोकल, भाजप नेते चंद्रकांत पाटील दिनेश पाटील, गणेश पाटील, जीवन टाकले सामजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच माडभुवन घेरावाडी आणि विविध वाड्यांचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## उपचारादरम्यान फिरस्त्याचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावर अनोळखी पुरूष फिरस्ता व्यक्ती (वय अंदाजे ५५ वर्षे) हा बेशुध्द अवस्थेत मिळून आला. त्याला रुग्णालयात औषधोपचार चालू असताना तो मयत झाल्याचे घोषीत करण्यात आले.

हा फिरस्ता अनोळखी व्यक्ती रंगाने काळासावळा असून त्याचा चेहरा गोल आहे. केस काळे सफेद, डोक्यात अर्धवट टक्कल असून त्याने मळकट पॅन्ट व शर्ट असा वेश परिधान केला आहे .याबाबत रसायनी पोलिस ठाण्यात अनोळखी मयत पुरुषाच्या मृत्युबाबत नोंद झाली असून पोलिसांनी ओळख पटविण्याचे आवाहन केले आहे. या व्यक्तीची ओळख पटल्यास रसायनी पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आर.टी.सुर्यवंशी (९८३३२२११२१) यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पनवेल ग्रामीण परिसरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे रुग्णांचे जीव धोक्यात आले आहेत. अशा बोगस डॉक्टरांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करा, अशी मागणी ग्रामस्थांकडून पनवेल महापालिकेकडे तसेच संबंधित शासकीय वैद्यकीय विभागाकडे करण्यात येत आहे.

पनवेल तालुक्यातील अनेक ग्रामीण भागात परप्रांतीय बोगस डॉक्टरांनी आपले हात पाय पसरवायला सुरुवात केली आहे. अनेक डॉक्टरांच्या डिग्र्यासुद्धा बोगस असल्याचे दिसून येत आहे. अशांविरुद्ध या पूर्वीसुद्धा कारवाई करण्यात आल्या आहेत. पनवेल परिसराचा विकास मोठ्या प्रमाणात होत असल्याने या डॉक्टरांनी अश्या ठिकाणी आपले बस्तान बसवण्यास सुरुवात केली आहे. जुजबी वैद्यकीय औषधांचे ज्ञान, इतर ठिकाणी डॉक्टरांच्या हाताखाली केलेली कामे, तसेच इंटरनेटच्या माध्यमातून माहिती घेऊन त्या आधारे उपचार करण्याचे प्रकार हे बोगस डॉक्टर करीत आहेत. त्यामुळे अनेक वेळा एखाद्या व्यक्तीच्या नाहक जीवावर सुद्धा बेतू शकते.

या घटना टाळण्यासाठी तातडीने अश्या बोगस डॉक्टरांवर कारवाई होते गरजेचे असल्याने संबधित शासकीय वैद्यकीय विभागाने कारवाई करावी अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.



**पनवेल : महापालिकेच्या माजी नगरसेविका राजश्री वावेकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी नगरसेवक समीर ठाकूर, भाजप नेते महेंद्र वावेकर उपस्थित होते.**
(छाया : विकास म्हात्रे)



**पनवेल : सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी भाजप पनवेल तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांचे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, शहर वैद्यकीय सेल संयोजक ज्योती देशमाने आदींनी स्वागत केले.**

## भाजप महिला मोर्चातर्फे रक्षाबंधनाचा कार्यक्रम







**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप महिला मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष वानथीआक्का श्रीनिवासन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महाराष्ट्र महिला मोर्चा प्रदेश अध्यक्ष चित्रा वाघ, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व खारघर तळोजा महिला मोर्चा अध्यक्ष साधना अशोक पवार यांच्या पुढाकाराने रक्षाबंधनाचा स्नेहयात्रा हा कार्यक्रम शुक्रवारी (दि. १) खारघर तळोजा महिला मंडळ मोर्चातर्फे साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत सर्वांना सेवा देणारे असे भाजीवाले मुस्लिम बंधू व रिक्षावाले बंधू तसेच सेवा देणाऱ्या काही महिला भगिनी यांना राखी बांधून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. अशा या शुभप्रसंगी केंद्रीय समन्वयक समिती सदस्य संध्या शारबिद्रे, महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा सोशल मीडिया सहसंयोजिका बिना गोगरी उपस्थित होत्या.

चिटणीस अंकिता वारंग, प्रभाग ६ अध्यक्ष नीलम विसपुते, सोशल मीडिया सहसंयोजिका कंचन बिर्ला, माजी सैनिक सेल अध्यक्ष निर्मला यादव, जिल्हा अनुसूचित जाती सदस्या सीमा खडसे, सेक्टर ११ अध्यक्ष अश्विनी भुवड, स्मिता आचार्य, स्नेहल बोधाई, श्यामला सुरेश, माया सिंग, मीनाक्षी अंतवाल, नंदा पानसरे, नूतन सिंग, दुर्गादेवी, विजया ठाकूर या महिलांच्या सहकार्याने हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

## द्रोणागिरी नोड येथे आज जनता दरबार

### आमदार महेश बालदी यांची लाभणार उपस्थिती

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमधील समस्या बाबत आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत जनता दरबार चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजक भाजप द्रोणागिरी उरण हे आहेत, अशी माहिती द्रोणागिरी भाजप अध्यक्ष विधीत पाटील यांनी दिली.

हा कार्यक्रम रविवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता सेक्टर ५० प्लॉट न. १३६ आर्यन हाईट्स द्रोणागिरी – उरण येथे आयोजित करण्यात आले आहे, असे द्रोणागिरी अध्यक्ष विधीत पाटील यांनी सांगितले. या कार्यक्रमात द्रोणागिरी नोड मधील समस्याविषयी चर्चा होणार आहे. त्यात सेक्टर ५१ आणि ५२ पूल ९ ब्रिज) संदर्भ, द्रोणागिरी पोलीस चौकी, डम्पिंग ग्राउंड, स्ट्रीट लाईट, पुरेसा पणी पुरवठा, हॉस्पिटल, ग्राउंड, सीसीओसी, संदर्भ, कॅमेरा बसविणे, रेल्वे स्टेशन, सेक्टर ४७ ते ५५ गटर चोकअप, ड्रेनेज नाळा, सर्व प्रकारचे सरकारी दाखले देण्याबाबत आदी विषयांवर चर्चा होणार आहे.

या बैठकीस आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष रवी भोईर, महालन विभाग अध्यक्ष महेश कडू, माजी जि. प. सदस्य विजय भोईर, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, तालुका उपाध्यक्ष पंडित घरत, सरचिटणीस सुनील पाटील आदी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती द्रोणागिरी भाजप अध्यक्ष विधीत पाटील यांनी दिली.

## इस्कॉन मंदिरात गोकुळाष्टमीनिमित्त कार्यक्रम

**खारघर : प्रतिनिधी**

खारघरमधील इस्कॉन मंदिरात भव्य गोकुळाष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. २७ ते ८ सप्टेंबरदरम्यान विविध कार्यक्रम इस्कॉन मंदिरात होणार आहेत. याबाबत शुक्रवारी (दि.१) पत्रकार परिषदेत माहिती देताना मंदिराचे अध्यक्ष सूरदास प्रभू यांनी यावर्षी पाच लाख भाविक या उत्सवाला भेट देणार असल्याचे सांगितले.

या उत्सवादरम्यान झुलन यात्रा, हरे कृष्णा भक्त रस उत्सव,श्री बलराम जयंती, श्री कृष्णा जन्माष्टमी फेस्टिवल, श्री कृष्ण कलश अभिषेक, इस्कॉनचे संस्थापक श्री प्रभूदास यांची १२७वी व्यासपूजा आदी कार्यक्रम पार पडणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान पनवेल, नवी मुंबई, मुंबई, ठाणे आदी ठिकाणचे भक्तगण मोठ्या संख्येने हजर राहणार आहेत.

या वेळी भक्तांना श्री कृष्णाच्या जन्माष्टमी सोहळयानिमित्त दर्शनाची देखील संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती सूरदास प्रभू यांनी दिली.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये पालक शिक्षक बैठक



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. २) प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांसोबत सोबत संवाद साधण्यासाठी पालक शिक्षक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीसाठी प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांच्या पालकांना आमंत्रण देण्यात आले होते. या बैठकीसाठी अकाउंट व फायनान्स, बी. एम. एस., कॉमर्स, बीएससी आयटी, सी.एस व शास्त्र विभागातील सुमारे १०० पालक या बैठकीसाठी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित असलेल्या पालकांबरोबर संवाद साधला व सर्वांना महाविद्यालयातील विविध उपक्रमांबद्दल विशेष माहिती देत असताना महाविद्यालयातील सुरू असणाऱ्या विविध कोर्सेस बद्दल तसेच राबविण्यात येणारे शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणीय उपक्रम व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये मिळवलेले यश व भविष्यामध्ये राबवण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांबद्दल सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी तसेच भविष्यात सर्वांनी विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी सर्व विभागाचे विभाग प्रमुख व वर्ग शिक्षकांनी पालकांसोबत संवाद साधला व विविध कोर्सच्या व परीक्षा सत्रांची सविस्तर माहिती दिली त्याचबरोबर पालकांनी सुद्धा आपले विचार मांडले तसेच सर्व शिक्षकांनी पालकांच्या विचारांचे व अपेक्षांचे आदर करीत ते पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

या वेळी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा, माहिती व तंत्रज्ञान व कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख प्रा. स्नेहा लोखंडे, बीएमएस विभाग प्रमुख प्रा. रीत ठुले, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. नम्रता पारीक व सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीचे आयोजन शिक्षक पालक संघटनेच्या समन्वयक प्रा. तनुजा सुमन (कॉमर्स विभाग) व प्रा. रिजवाना मोमीन (विज्ञान विभाग) यांनी केले तसेच सर्व विभाग प्रमुख सर्व शिक्षकांनी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## जसखार येथे मंगळागौर उत्सव



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील जसखार येथे उत्तर रायगड महिला मोर्चा उपाध्यक्षा संगीता प्रशांत पाटील यांच्या निवासस्थानी सालाबादप्रमाणे यंदाही मंगळागौर उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास आलेल्या मान्यवरांचे, पाहुण्यांचे संगीता पाटील यांनी स्वागत करून आभार मानले. यंदाचे १२वे वर्ष आहे. या कार्यक्रमात सखी मंगळागौर ग्रुप पनवेल व कुंडे गाव महिला मंडळ यांनी पारंपारिक नृत्य, गाणी, खेळ सादर केले. सुमारे एक हजारहून जास्त भाविकांनी दर्शन घेऊन उपस्थिती दर्शविली. सर्वांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास भाजप रायगड जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा अश्विनी पाटील, जिल्हा समन्वयक संध्या शारबिद्रे, पनवेल महापालिका उपमहापौर चारुशीला घरत, उरण तालुका महिला मोर्चा अध्यक्ष राणी म्हात्रे, उरण तालुका महिला मोर्चा सरचिटणीस निर्मला घरत, उरण नगर परिषद माजी नगराध्यक्षा सायली म्हात्रे, भाजप उरण शहर महिला अध्यक्ष संपूर्णा थळी, माजी नगरसेविका जान्हवी पंडित, सामाजिक कार्यकर्त्या संगीता पवार आदी उपस्थित होते.

## श्रीकृष्णाची शाडूमूर्ती बनवण्याची धर्मा कुंभार कुटुंबाची १०२ वर्षांची परंपरा

**पनवेल : प्रतिनिधी**

श्रावण वद्य अष्टमी हा श्रीकृष्णाचा जन्मदिवस. श्रीकृष्ण हा भारतीयांचा लाडका देव. त्यामुळे गोकुळाष्टमी-कृष्णाष्टमीचा हा उत्सव मोठ्या थाटामाटाने सर्वत्र साजरा केला जातो. मंदिरातून आरास केली जाते. रात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्म सोहळा केला जातो. भजन, पूजन, कीर्तन आदी कार्यक्रम आयोजित केले जातात. पनवेलच्या प्रभू आळीतील सिकेपी समाजाच्या ३०० वर्षा पेक्षा जुन्या लक्ष्मी-नारायण मंदिरातील श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे मंदिरात शाडूच्या श्रीकृष्णाच्या मूर्तिची प्रतिष्ठापना केली जाते. पनवेलमधील कुंभार आळीतील धर्मा गणपत कुंभार यांच्या कुटुंबाकडूनच ही मूर्ती बनवण्याची परंपरा आहे, अशी मूर्ती इतर कोठेही नसते.


पनवेलच्या कुंभारवाड्यातील धर्मा कुंभार यांच्या चौथ्या पिढीतील नरेश कुंभार हे आता आपल्या कुटुंबासह व्यवसाय सांभाळत आहेत ते म्हणतात, पनवेलमधील सीकेपी समाजाच्या लक्ष्मी-नारायण मंदिरात श्रीकृष्णाची चार हातवाली विष्णूसारखी मूर्ती १०२ वर्षे आमच्या कुटुंबाकडून घेतली जाते अशी मूर्ती इतर कोठे ही नसते. शाडूची मूर्ती काही जण नेतात, पण ती दोन हातवाली असते. आमच्याकडे गोकुळष्टमीला ही मूर्ती आणि हंडीसाठी रंगवलेली मडकी घेऊन गेल्यावर गणपतीच्या मूर्ति न्यायला सुरुवात होते. दरवर्षी हजार-बाराशे मडकी लागतात. पूर्वी मडकी इथेच बनवीत होतो, पण पनवेल शहर वाढले. आजूबाजूला सिडकोच्या वसाहती झाल्याने शेतातली माती मिळत नाही. याशिवाय मडकी भाजण्यासाठी भट्टी (आवा) लावली तर आजूबाजूच्या लोकांना त्रास होतो. त्यामुळे आम्ही आमच्या कुंभारांची गावे असलेल्या चौक, तुपगाव, मुरबाड व शहापूर येथून मडकी आणून रंगवतो. त्यासाठी माझी आई, पत्नी नम्रता, मुलगा नीरज, मुलगी, भावाची पत्नी व मुले अशी सगळे मदत करतात. मडकी रंगवण्यासाठी रंग, ब्रश आणावे लागतात त्याच्याकिमती ३० टक्के वाढल्या आहेत. त्यामुळे हंडीसाठी लागणाऱ्या मडक्यांचे दर मागिला वर्षीपेक्षा वाढलेले आहेत.





# जेव्हा दोन भारी हीरो एकत्र येतात...

**एक वेळ च्युईंगम चघळून चघळून एकदाचा कंटाळा येईल. पण दोन भारी हीरो एकाच चित्रपटात एकत्र आले रे आले की सालों साल तो विषय चघळायचा जणू परवानाच मिळाला समजा....**






झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

'कभी अलविदा ना कहना' (२००६) नंतर तब्बल सतरा वर्षांनी अमिताभ बच्चन व शाहरुख खान एकत्र येताहेत हे नुसतं जाहीर होताच, लगेच त्याची ब्रेकिंग न्यूज झाली. ट्वीट झाले. सोशल मिडियात कॉमेन्टस आल्या. बरं, आजच्या काळात 'एकाच बातमीत त्या चित्रपटाचे नाव, त्याचा दिग्दर्शक, त्यातील अन्य कलाकार' असे महत्वाचे तपशील नसतात. एकेक गोष्ट बाहेर काढली जाते. अर्थात बीग बी आणि एसआरके एकत्र येणे ही मोठीच खबर आहे. मोहब्बते (२०००) च्या वेळेस ते सर्वप्रथम एकत्र आले. आपल्या 'पडत्या काळातून' बाहेर पडण्यासाठी बीग बीला 'मोहब्बते ' खूपच महत्वाचा होता. ऐन दिवाळीत तो आला. तेव्हा शाहरुख खान 'सुपर स्टार' असला तरी बीग बीची गुणवत्ता भारी होती. ते तर कायमचे चलनी नाणे. त्या काळात बीग बीच्या मृत्यूदाता, सूर्यवंशम, कोहराम, लाल बादशाह या सामान्य चित्रपटांना पब्लिकने नाकारल्याने बीग बीच्या पुढील वाटचालीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. मुळात बीग बीने हे चित्रपट स्वीकारलेच कसे हाच प्रश्न होता. त्यातच त्याच्या एबीसीएल या कंपनीने गाशा गुंडाळलेला. बच्चन खानदान मोठ्याच कर्जात असल्याच्या बातम्या होत्या. याच संकटात अमिताभने दोन गोष्टी केल्या. एक म्हणजे, 'कौन बनेगा करोडपती' या गेम शोचे सूत्रसंचालन स्वीकारत छोट्या पडद्यावर पाऊल टाकले (तो प्रवास आजही झक्कास सुरु आहे) आणि आपल्या जुहूच्या बंगल्याजवळच असलेल्या यश चोप्रा यांची भेट घेऊन 'एक चित्रपट द्या' अशी मागणी केली असा किस्सा गाजला. यशजींनी यशराज फिल्म्सच्या आदित्य चोप्रा दिग्दर्शित 'मोहब्बते'मध्ये बीग बीच्या वयाला साजेशी भूमिका दिली. जून २००० मध्ये केबीसी सुरू होताच बीग बी छा गया आणि आता पुन्हा फॉर्मात असलेल्या बीग बीने शाहरुख खानचं युग असतानाच आपलं नाणं आजही खणखणीत आहे याचा प्रत्यय दिला. 'मोहब्बते' ऐन दिवाळीत आला तोच बीग बीला लक्षवेधक ठरवत. फॉर्म टेम्पररी असतो, गुणवत्ता कायम असते या अलिखित नियमानुसार बीग बी पुन्हा ट्रॅकवर आल्यावर नवीन इनिंग सुरू झाली ती आजही सुरु आहे. त्यानंतर करण जोहर दिग्दर्शित 'कभी खुशी कभी गम' (२००१), अमोल पालेकर दिग्दर्शित 'पहेली' (२००५), करण जोहर दिग्दर्शित 'कभी अलविदा ना कहेना' (२००६) या चित्रपटात ते दोघे एकत्र आले. बीग बीच्या गुणवत्तेची उंची आणि आपल्या इमेज व लोकप्रियता यांच्या विलक्षण प्रेमात असलेला शाहरुख हे एकत्र येताना दिग्दर्शकांनी दोघांनाही सारखेच फूटेज दिले. या दोघांचा आणखीन दोनदा वेगळा संबंध आला. शाहरुखनेही केबीसीच्या एका पर्वात खेळी केली. त्यात तो काहीसा कॉन्सश वाटला. बीग बीची सर येणे शक्यच नव्हते. पण चित्रपटात तो मोकळीक घेतो ते यात त्याला जमले नाही. या जोडीचा दुसरा संबंध म्हणजे चंद्रा बारोट दिग्दर्शित 'डॉन 'ची (१९७९) दिग्दर्शक फरहान अख्तरने रिमेक केली. (२००६). मूळ चित्रपटाची सलिम जावेद यांची पटकथा व संवाद बंदिस्त होते. रिमेक स्टाईलीश होती आणि शाहरुखने त्यात रंग आणला. मूळ चित्रपटातील खायके पान बनारसवालाचा रंग आणि अमिताभचे नृत्य हमखास टाळ्या वसूल करणारे होते.


दोन बडे हीरो एकाच चित्रपटात एकत्र येताच चर्चेला खाद्य मिळण्याची परंपरा खूपच जुनी. मेहबूब खान दिग्दर्शित 'अंदाज'(१९४९)च्या वेळेस दिलीपकुमार, राज कपूर व नर्गिस असे कसदार अभिनय करणारे तिघे एकाच चित्रपटात यातून चुरशीचा असा अभिनयाचा जबरदस्त तिरंगी सामना रंगला आणि तिघेही भारी ठरल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. ही प्रेम त्रिकोण/आकर्षणाची गोष्ट. नायक नायिका (राज कपूर व नर्गिस) एकमेकांच्या प्रेमात आहेत पण त्यांच्या कॉमन मित्राला (दिलीपकुमार) ती आवडतेय. त्यासाठी तो कुटील भावना बाळगतोय. तिघांचेही फॅन्स आपल्याच कलाकाराने भारी अभिनय करत इतर दोघांना झाकून टाकलयं यावर ठाम आणि मग कट्टा/नाका/ गच्ची/कॉलेज कॅन्टीन/इराणी हॉटेल येथे वाद. ते दिवसच वेगळे होते. पडद्यावरच्या विश्वात रममाण होणारे, त्यात हरखून जाणारे आणि आपल्या आवडत्या हीरोची मनापासून भक्ती करणारे.

दिलीपकुमारने तो आणि अन्य नायक असे चित्रपट केले तेव्हा मिडियापासून चाहत्यांपर्यंत उलटसुलट चर्चेचा गदारोळ उठलाय. राजकुमार (१९५९ ला 'पैगाम' आणि त्यानंतर तब्बल बत्तीस वर्षांनी 'सौदागर'. आता दोघांचेही वय फार वाढलेले पण एकमेकांवर मात करण्याची रग कायम होती. तीच जिंकण्याची उर्मी जागी करते. दिग्दर्शक सुभाष घईने दोघांना एकत्र कसे आणले याचं कुतूहल होतं. दोघांनाही साईन करेपर्यंत एकमेकांची कल्पना दिली नाही असे गॉसिप्स रंगले.), संजीवकुमार (१९६८चा 'संघर्ष' आणि त्यानंतर १९८२चा 'विधाता'), अमिताभ बच्चन (१९८२ चा 'शक्ती') . दिलीपकुमारचे हे दोन नायकवाले चित्रपट फारच गाजले. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शक्ती 'मधील या दोघांवरची दृश्य चित्रीत होत असतानाचा सेटवरचा तणाव चर्चेचा विषय ठरला. त्यावरही लिहिले गेले. वांद्र्यातील बॅण्ड स्टॅन्डवरील दोघांवरच्या दृश्याचे चित्रीकरण फार गाजले. काही दृश्यात बच्चनने आपला क्लास दाखवल्याचे त्याचे समर्थक म्हणाले, पण तो तर दिलीपकुमारला आदर्श ठेवून घडला असे प्रत्युत्तर दिले गेले. दिग्दर्शक रमेश सिप्पीने हे शिवधनुष्य उत्तम पेलले. तोपर्यंत अमिताभने रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (१९७५) व 'शान' (१९८०) या चित्रपटात भूमिका साकारली होती. त्यामुळे एकमेकांच्या कामाची पद्धत/ क्षमता/ मानसिकता माहित होतीच. दिलीपकुमारकडे लौकिक होता. सर्व समिकरण जमून आले होते.

दोन तीन नायकवाल्या चित्रपटात चाहते असे गुंतल्याने अनेक गोष्टींचा उहापोह होतो. अनेक लहान मोठे मुद्दे व गुद्दे समोर येतात. यात सर्वाधिक गाजलेला चित्रपट हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम' (रिलीज २३ नोव्हेंबर १९७३). हृषिदांच्याच 'आनंद' (१९७१) मध्ये तत्पूर्वी ते एकत्र आले तेव्हा सगळी सहानुभूती 'आनंद'ला अर्थात राजेश खन्नाला गेली तरी अमिताभचेही संयत अभिनयाने अस्तित्व जाणवते. 'नमक हराम'च्या नॉव्हेल्टी थिएटरमधील प्रीमियरपर्यंत राजेश खन्नाचे पारडे जड होते. त्यानंतर अमिताभच्या कामाची तारीफ होऊ लागली. कौन है वो मायका लाल जिसने मेरे सोनू पर हाथ उठाया...विकीचा (अमिताभ) चित्कार पब्लिकच्या प्रचंड टाळ्या शिट्ट्या मिळवणारा ठरला आणि समिक्षक, विश्लेषक, चाहते यांत जोरदार चर्चा सुरु झाली, राजेश खन्ना श्रेष्ठ की अमिताभ? आता हवा अमिताभच्या बाजूने होती, पण राजेशचे चाहते हार मारणाऱ्यातील नव्हते. प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (प्रदर्शन ११ मे १९७३) च्या यशाने अमिताभ आता फार फॉर्मात होता. त्याला न्ग्री यंग मॅनची इमेज मिळालेली. तसा यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग' (रिलीज २७ एप्रिल १९७३) ही सुपर हिट होताच. राजेश खन्नाच्या रोमॅन्टीक अदा लोकप्रिय होत्याच. तात्पर्य, दोघांच्याही फॅन्सना वादविवाद घालायला भरपूर मसाला होता. रंग आणि रंगत वाढत वाढत गेली. केवढं त्यावर लिहिलं/बोललं/ ऐकलं गेले काही विचारुच नका. यात केवढे तरी किस्से/ कथा/ दंतकथा/ गोष्टी यानिमित्त चर्चेत आल्या/राहिल्या.

आता सोशल मिडियात ट्रोल करण्याचं युग आहे. बीग बी आणि शाहरुख यांच्या एकत्र येण्यावर सोशल मिडियात कॉमेन्टस, लाईक्स आलेच...दोन कलाकारांचा सामना हीदेखील एक वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट संस्कृती. तेवढेच चर्चेला उधाण.

# महाराष्ट्र शाहीर कृष्णराव तथा शाहीर साबळे



'गर्जा महाराष्ट्र माझा, जय जय महाराष्ट्र ड्हरहळी डरलश्रश माझा' हे गीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवणारे, मुक्तनाट्याचे आद्य प्रवर्तक लोकशाहीर कृष्णराव साबळे (वय ९२) यांचा आज जन्मदिन आहे त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

सातारा जिल्ह्यातील पसरणी (ता. वाई) या छोट्या खेड्यात ३ सप्टेंबर १९२३ रोजी कृष्णराव साबळे यांचा जन्म झाला. साने गुरूजींकडून प्रखर राष्ट्रवाद आणि निर्व्याज देशभक्तीचं बाळकडू त्यांनी आत्मसात केलं. जागृती शाहीर मंडळाच्या माध्यमातून राजकीय, सामाजिक अपप्रवृत्तींवर प्रहार केले. १९४२ साली शाहीर शंकरराव निकम यांच्याकडून त्यांनी शाहिरी कलेचे प्रत्यक्ष धडे घेतले. स्वातंत्र्य चळवळ असो की, हैदराबाद मुक्ती संग्राम संयुक्त महाराष्ट्राचा लढा असो की, गोवा मुक्ती आंदोलन शाहिरांचा डफ कडाडत राहिला. मात्र, 'महाराष्ट्राची लोकधारा' या कार्यक्रमानं शाहीरांचं आयुष्यच पालटून गेलं. महाराष्ट्राच्या विविध संस्कृतीचं आणि कलांचं दर्शन घडवणारा हा कार्यक्रम तुफान गाजला. संगीत दिग्दर्शक मुलगा देवदत्त, नृत्य दिग्दर्शिका कन्या चारूशीला, यशोधरा असं अख्खं साबळे कुटुंबच महाराष्ट्राच्या लोकधारेत सामावून गेलं होतं.

शाहिरांचा कलागुणांचा वारसा त्यांचे नातू प्रख्यात सिने-नाट्य दिग्दर्शक केदार शिंदे यांनीही जोपासलाय.

शाहीर साबळे यांच्या लेखनकृती : आबुरावाचं लगीन (मुक्तनाट्य), आंधळं दळतंय (मुक्तनाट्य), ग्यानबाची मेख (मुक्तनाट्य), यमराज्यात एक रात्र (इ.स. १९६०, पहिले मुक्तनाट्य), बापाचा बाप (मुक्तनाट्य)

**शाहीर साबळे यांनी गायलेली आणि लोकप्रिय झालेली गीते**

अरे कृष्णा हरे कान्हा (तमाशा गीत), अशी ही थट्टा (तमाशागीत), आई माझी कोणाला पावली (भक्तिगीत), आज पेटली उत्तर सीमा (देशभक्तिपर गीत), आठशे खिडक्या नऊशे दारं (लोकगीत), आधी गणाला रणी आणला (गण), आधुनिक मानवाची कहाणी (कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान सांगणारा पोवाडा),जय जय महाराष्ट्र माझा (महाराष्ट्र गीत), जेजुरीच्या खंडेराया जागराला (भारूड), दादला नको ग बाई (भारूड), पयलं नमन हो करीतो (गण), फुटला अंकुर वंशाला आज (समाजजागृती गीत), बिकट वाट वहिवाट नसावी (फटका), मल्हार वारी मोतीयाने द्यावी भरून (भक्तिगीत), महाराज गौरीनंदना (गण), महाराष्ट्र जय महाराष्ट्र (स्फूर्तिगीत), मायेचा निजरूप आईचा (भावगीत), मुंबावतीची लावणी, या गो दांड्यावरना बोलते (कोळीगीत), या विठूचा गजर हरिनामाचा (भक्तिगीत), विंचू चावला (भारूड), सैनिक माझे नाव (स्फूर्तिगीत), हय पावलाय देव मला (लोकगीत)

**शाहीर साबळे यांना मिळालेले सन्मान आणि पुरस्कार**

अखिल भारतीय मराठी शाहिरी परिषदेचे अध्यक्षपद, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवणारे एकमेव शाहीर, भारत सरकारतर्फे पद्मश्री मिळवणारे पहिले शाहीर, भारतीय शांतिदूत मंडळाचे प्रतिनिधी म्हणून रशियाचा दौरा करणाऱ्या पथकात सहभाग, पहिला शाहीर अमर शेख पुरस्कार, दिल्लीच्या संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार, संत नामदेव पुरस्कार, पुणे महापालिकेचा शाहीर पठ्ठे बापूराव पुरस्कार, १९५४-५५ मध्ये हिज मास्टर्स व्हॉईस ग्रामोफोन रेकॉर्ड कंपनीचे सर्वाधिक यशस्वी कलाकार म्हणून महंमद रफींबरोबर नाव झळकलेले कलावंत.

**(साभार : इंटरनेट)**

# अष्टविनायकाचा अगाध महिमा



अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या या देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाईच्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते. महाराष्ट्रातील या विशिष्ट आठ ठिकाणच्या गणेश मंदिरांना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांना मिळून अष्टविनायक म्हटले जाते.

गणपतीचे असंख्य भाविक अष्टविनायकाची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविनायक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्ह्यात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्ह्यात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्ह्यात एक (सिद्धटेक) या ठिकाणी अष्टविनायक स्थाने आहेत. या गणपतींपैकी महड, सिद्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे.

**मोरगाव**

अष्टविनायकांपैकी पहिला गणपती हा मोरगावचा मोरेश्र्वर. या गणपतीस श्री मयुरेश्वर असेही म्हणतात. थोर गणेशभक्त मोरया गोसावी यांनी येथील पूजेचा वसा घेतला होता. श्री मोरेश्वर गणेशाचे, हे स्वयंभू व आद्यस्थान आहे. प्रत्येक घरात म्हटली जाणारी ' सुखकर्ता दु:खहर्ता' ही आरती श्री समर्थ रामदास स्वामींना याच मंदिरात स्फुरली, असे म्हटले जाते. श्री मोरेश्र्वराच्या डोळ्यांत व बेंबीत हिरे बसवलेले आहेत. पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यात मोरगांव हे ठिकाण आहे. मोरगाव हेरावर आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत जेजुरीचा खंडोबा हा मोरगावपासून अगदी १७ किमी अंतरावर आहे.

**थेऊर**

अष्टविनायकांपैकी थेऊरचा श्री चिंतामणी हा दुसरा गणपती आहे. भक्तांच्या चिंतेचे हरण करणारा म्हणून याला चिंतामणी म्हणतात. थेऊरचा विस्तार हा माधवराव पेशवे यांनी केला. थेऊर पुणे-सोलापूर महामार्गाला जोडलेल्या रस्त्यावर, तालुक्यात असून पुण्यापासून हे ३० किमी अंतरावर आहे.

**सिद्धटेक**

सिद्धटेकचा श्री सिद्धिविनायक हा अष्टविनायकांपैकी तिसरा गणपती आहे. हे भीमा नदीवर वसलेले सिद्धिविनायकाचे स्वयंभू स्थान आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी जीर्णोद्धार करून मंदिर बांधले आहे. मंदिरात पितळी मखर असून त्याभोवती चंद्र-सूर्य-गरुड यांच्या प्रतिमा आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात हे ठिकाण असून दौंडपासून १९ किमी अंतरावर आहे.

**रांजणगाव**

अष्टविनायकांपैकी चौथ्या गणपतीला महागणपती असे म्हणतात. हे महागणपतीचे स्वयंभू स्थान आहे. पुणे-अहमदनगर मार्गावर शिरूर तालुक्यात हे ठिकाण आहे. अष्टविनायकांपैकी सर्वाधिक शक्तिमान असे महागणपतीचे रूप आहे. श्री महागणपती उजव्या सोंडेचा असून गणेशाला कमळाचे आसन आहे. माधवराव पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे इतिहासात आढळते. श्री गणेशाला दहा हात आहेत आणि प्रसन्न व मनमोहक अशी श्रींची मूर्ती आहे.

**ओझर**

अष्टविनायकांपैकी ओझरच्या विघ्नेश्र्वर हा पाचवा गणपती आहे. येथील श्रींची मूर्ती लांब रूंद असून अष्टविनायकांपैकी सर्वात श्रीमंत गणपती म्हणून श्री विघ्नेश्वराला ओळखले जाते. श्रींच्या डोळ्यात माणिक असून, कपाळावर हिरा आहे. ही गणेशाची स्वयंभू मूर्ती आहे.

**लेण्याद्री**

अष्टविनायकांपैकी सहावा गणपती लेण्याद्रीचा श्री गिरिजात्मज. किल्ले शिवनेरीच्या सान्निध्यात, जुन्नर तालुक्यातील प्राचीन जुन्नर लेण्यांच्या समुदायात आणि कुकडी नदीच्या परिसरात डोंगरावर श्री गिरिजात्मज गणेशाचे हे स्वयंभू स्थान आहे. श्री गणेशाची प्रसन्न मूर्ती असून ती दगडामध्ये कोरलेली आहे. मंदिरात दगडी खांब आहेत व त्यावर वाघ, सिंह, हत्ती असे सुंदर नक्षीकाम केलेले आहे. मंदिरात जाण्यासाठी डोंगरावर सुमारे ४०० पायऱ्या आहेत.

**महड**

महडचा वरदविनायक हा अष्टविनायकांपैकी सातवा गणपती आहे. हे स्वयंभू स्थान असून त्याला मठ असेही म्हणतात. श्री वरदविनायकाचे मंदिर साधे, कौलारू असून मंदिराला घुमट आहे व त्याला सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे.

**पाली**

पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे. या गणपतीला श्री बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचे हे स्वयंभू स्थान आहे. मंदिर पूर्वाभिमुख आहे. गणेशाचे कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत.

**(साभार : इंटरनेट)**

# जे वाट्याला येते ते स्वीकारा आणि पुढे जा...

सकाळी-सकाळी एका अनोळखी मुलीचा कॉल आला. ती माझ्या एका मित्राची मैत्रिण होती. माझे लेख ती मित्राच्या स्टेटसवर नेहमी वाचते आणि त्यातून तिला प्रेरणा मिळते अशी ती सांगत होती. तिचे शब्द ऐकून समाधान वाटले. मी तिला पुढे विचारले, बोला सकाळी-सकाळी कसा काय कॉल केला? त्यावर त्या मुलीने सांगितले, दादा, माझ्या खूप जवळच्या काही मैत्रिणी माझ्यापासून काही कारणाने दूर झाल्या आहेत. यावर मी काय करू, काही समजत नाही आहे. मी यंदा अंतिम वर्षाला असून मैत्रिणी दूर झाल्यामुळे माझ्या अभ्यासावर खूप परिणाम होत आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसापासून मी खूप तणावात आहे. कृपया मला मदत करावी.

विचार केला तर ही काही मोठी समस्या नव्हती. कारण प्रत्येकासोबत कधी ना कधी असा प्रसंग घडतोच. पण तिच्या बाजूने बघितले असता ही समस्या वाटते तितकी सोपी पण नव्हती. कारण माणसाला माणसाचे लागलेले व्यसन फार भयंकर असते आणि माणसाचे लागलेले व्यसन मेडिकल मधील कोणत्याही औषधीने सुटत नाही हेही तितकेच खरे. त्यासाठी माणूसच हवा असतो. पण



बऱ्याचदा हा माणूस मिळणे कठीण होऊन जाते आणि आपण एकटे पडून जातो. ज्यावेळी आपण एकटे पडतो तेव्हा मात्र मनाची अवस्था फार वाईट होते. कारण मुळात एकटे राहण्याची सवय आपल्याला नसते. म्हणून आपण तिथेच गुंतून राहतो.

माहित आहे का? आपल्याला फरक तेव्हाच पडतो जेव्हा समोरच्या व्यक्तीमध्ये आपला जीव अडकलेला असतो. त्यामुळे आपल्या आयुष्यात कुणाच्या जाण्याचा-येण्याचा जर आपल्याला फरक पडत असेल तर आपण मनातून त्या व्यक्तीला आपले मानले होते याचा स्वतःच अभिमान बाळगावा. कारण जीव नसलेल्या गोष्टीचा माणसाला कधीच फरक पडत नसतो. म्हणून आपण आपल्या बाजूने भक्कमपणे नात निभावलं तरीही समोरची व्यक्ती आपल्यापासून दुर होत असेल तर त्यात आपला दोष नाही हे आधी स्वतःला समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यामुळे कुणी आपल्याला सोडून जात असेल तर हसत-हसत अशा लोकांना निरोप देता आला पाहिजे.

हसत हसत निरोप देता आला तर अनेक प्रश्न आपोआप सुटत जातात. आपला मार्ग मोकळा होतो. आपण आपल्या वाटेला आणि समोरचा व्यक्ती त्याच्या वाटेला लागतो. त्यामुळे कोणत्याही गोष्टीत जास्त वेळ गुंतून राहू नका. कळत नकळतपणे घडलेल्या गोष्टीचा मोठ्या मनाने स्वीकार करावा आणि जोमाने पुढच्या प्रवासाच्या तयारीला लागावे. कारण आयुष्यातील अपघात कधी सांगून होत नाही. त्यामुळे कधीही आपल्यासोबत काहीही होऊ शकते. म्हणून आपल्या मनाची तयारी पक्की असली पाहिजे. त्यामुळे आज शरीराने मजबूत होण्यापेक्षा मनाने मजबूत होणे गरजचे झाले आहे. कारण मेडिकलच्या औषधीने शरीराची कमजोरी दूर करता येते, मनाची कमजोरी नाही.

आपली आपली म्हणणारी माणसे जेव्हा आपल्यापासून दुरावतात तेव्हा आपल्याला त्रास होतोच. पण एक लक्षात ठेवा. माणसे जशी दूर होतात, तशी जवळही येतात. फक्त आपण निस्वार्थी असलो पाहिजे. कारण आपण निस्वार्थी, प्रामाणिक असू तर आपली येणारी वेळ त्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपोआप देते. त्यामुळे एक अपघात झाला म्हणून आपल्या आयुष्याचा सुंदर प्रवास कधी थांबवायचा नाही. झालेल्या गोष्टी तिथेच सोडून देऊन माणसाने नेहमी चालत राहिले पाहिजे. कारण चालत राहणे हे आपल्या जिवंतपणाचे लक्षण आहे. म्हणून आपल्या वाट्याला जे येते त्याचा स्वीकार करून नेहमी आपण पुढे जात राहिले पाहिजे...

**-सुरज दहागावकर, चंद्रपूर**

# बोर्ली नाक्यावर रस्ता कॉंक्रीटीकरणास सुरुवात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील बोर्ली नाक्यावरील अत्यंत दयनिय अवस्थेत असलेल्या रस्त्या कॉंक्रीटीकरणास प्रारंभ झाला आहे. साळाव मुरूड रस्ताचे नुतनीकरण व दुरूस्ती मुरूड पर्यटनासाठी पर्यटकांच्या सुविधेसाठी व आगामी श्री गणेश उत्सवाचे पार्श्वभूमीवर येत्या पंधरा दिवसात करण्यात यावे असा इशारा रास्ता रोको आंदोलनात सार्वजनिक बांधकाम खात्यास दिला होता. बोर्ली नाका रस्ता कॉंक्रीटीकरण शिवसेनेच्या रास्ता रोको आंदोलनाचा इफेक्ट असल्याचे म्हटले जाते.

बोर्ली नाका येथे नुकतेच या रस्ता कॉंक्रिटीकरणाचा शुभारंभ कार्यक्रम झाला. या वेळी मुरूड सार्वजनिक बांधकाम विभाग उपअभियंता गोरे, कनिष्ट अभियंता सुरज अनुसे, ठेकेदार धनेश तांबडकर, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, शिंदे गट कार्यकर्ते सुरेश पालवणकर, जीवन परदेशी, शिंदे गट शिवसेना मुरूड तालुका युवासेना प्रमुख अमोल लाड, महेंद्र पाटील, आदीची उपस्थिती होती. बोर्ली नाका रस्ता कॉक्रिटीकरण शुभारंभ जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. तसेच ठेकेदार धनेश तांबडकर यांनी रस्ता कॉक्रिटीकरण सुयोग्य करण्याचे आश्वासन कामाचे सुरूवातीस दिले.

गेल्या अनेक वर्षापासून साळाव-मुरूड रस्त्यावरील बोर्ली नाका रस्तावर खड्डेच खड्डे पडले होते, ऐन पावसाळ्याचे दिवसात येथून वाहने चालविणे अत्यंत त्रासदायक होते. या रस्ताचे नूतनीकरण व दुरूस्ती गणेशत्सोवापूर्वी करण्यात यावी अशी मागणीसाठी मुरूड तालुका शिवसेनेकडून २९ ऑगस्ट रोजी रास्ता रोको आंदोलन बोर्ली नाक्यावर केले होते.



## माणगावात आज राष्ट्रवादीचा मेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक सेलचा मेळावा रविवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता गांधी मेमोरियल हॉल माणगाव याठिकाणी होणार आहे.

या मेळाव्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांक सेलचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर विद्रोही, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, पक्षाचे जेष्ठ नेते सुभान अली, विधान परिषद सदस्य आ. अनिकेत तटकरे, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मधुकर पाटील, महिला आघाडी रायगड जिल्हाध्यक्षा उमा मुंढे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश चिटणीस मुक्तार वेळासकर, दापोली नगरपंचायत उपनगराध्यक्ष खालिद राखांगी, प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस सरचिटणीस अतिक खतीब, राष्ट्रवादीचे श्रीवर्धन मतदार संघाचे अध्यक्ष महंमद मेमन, गोरेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच जुबेर अब्बासी, रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक सेलचे उपाध्यक्ष हिदायत कुदरते आदी मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यास तालुक्यातील अल्पसंख्यांक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अल्पसंख्यांक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष नाझीम हसवारे, उपाध्यक्ष अल्ताफदादा धनसे, माणगाव तालुका अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष बाळाभाई सनगे व सहकाऱ्यांनी केले आहे.

## शांतता कमिटीची बैठक




**माणगाव : प्रतिनिधी**

येणारे गोपाळकाला व गणेशोत्सव सण शांततेत व आनंदात साजरे करा असे आवाहन माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुले यांनी शांतता कमिटीच्या बैठकीत बोलताना केले.

येत्या ७ सप्टेंबर रोजी गोपाळकाला (दहीहंडी) तसेच दि. १९ सप्टेंबर रोजी गणेशोत्सव सण साजरे केले जाणार असून या सणांच्या अनुषंगाने माणगाव पोलीस ठाणे येथे शनिवारी (दि.२) उपविभागीय पोलीस अधिकारी माणगाव नितीनकुमार पोंदकुले यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक दहीहंडी व सार्वजनिक गणेश मंडळ अध्यक्ष, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत मंडळ अध्यक्ष, सदस्य व पोलीस पाटील यांना गोपाळकाला/दहीहंडी, गणपती सण शांततेत साजरा करणे बाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेणे याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुले व पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांनी मार्गदर्शन करून सूचना दिल्या आहेत.

या बैठकीला जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते संजयअण्णा साबळे, नागराध्यक्ष ज्ञानदेव पवार, सामाजिक कार्यकर्ते अल्ताफदादा धनसे, भाजपचे माणगाव शहराध्यक्ष नितीन दसवते, माजी ग्रामपंचायत सदस्य माणगाव काशीराम पोवार, आरडीसी बँकेचे संचालक अस्लम राऊत, माजी पंचायत समिती सदस्य सुधीर पवार, माणगाव तालुका रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रमेश जैन, व्यापारी संघटनेचे लक्ष्मण दळवी, अनंता पोवार आदींसह शांतता कमिटीचे ५० ते ५५ सदस्य उपस्थित होते.

## नथुबुवा पाटील पुण्यातिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम



**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील बळवली गावातील ह.भ.प. नथुराम तुकाराम पाटील उर्फ नथुबुवा यांची तृतीय पुण्यतिथी हवन, भजन, कीर्तन, हरिपाठ व विविध कार्यक्रमांनी करण्यात आली.

नथुबुवा हे भजनसम्राट होते. त्यांनी प्रवचन, कीर्तन, भजन, भारुड, हरिपाठ गायले होते. ह.भ.प. नथुराम तुकाराम पाटील हे पेण तालुका जेष्ठ नागरिक संघाचे सक्रिय पदाधिकारी होते. पेण तालुका मराठी साहित्य कला मंचच्या माध्यमातून त्यांनी काम केले होती. संस्कार, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन कार्यात ही ते सक्रिय सहभागी असायचे. हभप नथुराम बुवा यांच्या तृतीय पुण्यतिथीनिमित्त आज हवन प्रतिमा पूजन, पंचक्रोशी भजन, श्री श्री १००८ महामंडळेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज यांचे कीर्तन, हभप अमित महाराज यांनी सदर कीर्तनाचे नेतृत्व केले, श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अध्याय, हरिपाठ व विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## पनवेल महानगरपालिका

### जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी - १ नमुन्यात मागवीत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + १८% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल म हानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' येथील सेक्टर २, ब खांदा कॉलनी शंकर मंदिर गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ४,२०,१९०/- | ४२००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| २) | गणेशोत्सव २०२३ करोता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब' येथील सेक्टर १२. कळंबोली गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे, (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यवळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफर पुरविणे,हॅलोजन लावणे इत्यादी) | ४,२७,९८२/- | ४३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ३) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील पोदी, रेल्वे भूयारी मार्ग जवळ तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल ,खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,२२,३९३/- | ३३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ४) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड' येथील नविन पनवेल, सेक्टर-१४, धारण तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्पुष्यबळ पुरविणे मंडप बांधणे टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,२८,२१५/- | ३३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ५) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'व' येथील आदई तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यवळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,९३,०६२/- | ४०००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ६) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हटीतील प्रभाग समिती 'ड' येथील काळुंदे गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे, (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,२७,०३०/- | ३३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ७) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ' येथील बेलपाडा गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधापुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,७७,१५१/- | ३८००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ८) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका प्रथम अ' येथील कोपरा गाव येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे हॅलोजन लावणे इ.) | ४,७३,९९४/- | ४८००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ९) | गणेशोत्सव २०२३ पनवेल महानगरपालिका होलोन प्रभाग समिती अ येथील तळोजा फेज I गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे मंडप बांधणे टेबल खुर्च्या पुरविणे पुरविणे हलोजन लावणे इत्यादी. | ३,९९,९२६/- | ४०००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १०) | गणेशोत्सव २०२३ करोना पनवेल महानगरपालिका होल प्रभाग समिती येथील खारघर तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे मंडप बांधणे टेबल च्या पुरविणे तराफा पुरविणे हॅलोजन लावणे इत्यादी) | ४,२३,०४५/- | ४३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| ११) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' येथील मुर्बी तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,९०,१०८/- | ३९००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १२) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. समिती अ' येथील खुटुक बांधण गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,४१,०५८/- | ४५००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १३) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. समिती 'अ' येथील ओवे पेठ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे हॅलोजन लावणे इ.) | ३,७३,७६९/- | ३८००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १४) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' येथील पापडीचापाडा येथील गणेश पाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरव (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे,टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,४१,३१८/- | ३५००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १५) | गणेशोत्सव २०१३ पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती. 'क' येथील जुई गाव येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | २,८०९५/- | २९००/- | २००+३६=२३६ | ४५ दिवस |
| १६) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. समिती 'क' मधील कामोठे गाव येथील । गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विमार्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) | ४,२३,०५८/- | ४३००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १७) | गणेशोत्सव २०२३ करोता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'अ' येथील नावडे येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे मंडप बांधणे टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे हॅलोजन लावणे इत्यादी) | ३,७०,००१/- | ३७००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |
| १८) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती अ. खारघर सेक्टर १० येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) | २,९५,०११/- | ३०००/- | २००+३६=२३६ | ४५ दिवस |
| १९) | गणेशोत्सव २०२३ करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब तळोजा फेज-२ गावातील गणेश घाटाची दुरुस्ती आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुर्च्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) | ३,७७,५७१/- | ३८००/- | ५००+९०=५९० | ४५ दिवस |

याकामी निविदा प्रपत्र रोख रक्कम भरणा करुन दिनांक ०४/०९/२०२३ पासुन दि. ११/०९/२०२३ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.
४) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत लखोटा क्र. १ मध्ये सादर करण्याचा आहे.
५) सीलबंद निविदा दि. १२/०९/२०२३ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.
६) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि. १२/०९/२०२३ रोजी दुपारी ३.३० वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

**जा.क्र पमपा/बांधकाम/६५२३/प्र.क्र.७२/३१९१/२०२३**
**दि. ०१/०९/२०२३.**

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त-I**
**पनवेल महानगरपालिका**

# सणांमध्ये कायदा, सुव्यवस्था राखा!

## पोलीस प्रशासनातर्फे आवाहन

**उरण : बातमीदार**

उरण तेरापंथी हॉल येथे उरण आगामी दहिहंडी उत्सव, गणेशोत्सव, ईद ए मिलाद या सणांचे अनुषंगाने उरण पोलीस ठाण्याचे हद्दीतील सार्वजनिक दहिहंडी, गणेशोत्सवाचे अध्यक्ष व पदाधिकारी, शांतता व मोहल्ला कमिटी सदस्य, महिला दक्षता कमिटी, पोलीस पाटील, सरपंच, सागरी सुरक्षा रक्षक दल यांची बैठक घेण्यात आली.



या बैठकीमध्ये आगामी दहिहंडी, गणेशोत्सव, ईद ए मिलाद हे सण शांततेत व मोठ्या उत्साहात पार पडण्याच्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागातील शासकीय अधिकारी तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी शासन परिपत्रकानुसार उपस्थितांना मार्गदर्शन केले व विविध सूचना दिल्या. त्या सूचना खालीलप्रमाणे.

दहिहंडी उत्सवामध्ये सामील होणाऱ्या गोविंदाचे वय १४ वर्षापेक्षा कमी नसावे, दहिहंडी उत्सव मंडळाने दहिहंडी मोकळया मैदानात लावावी. दहिहंडी जास्त उंचावर बांधण्यात येऊ नये, गोविंदा पथकाचा विमा उतरविण्यात यावा, दहिहंडी उत्सवा दरम्यान कोणीही डी जे डॉल्बी साऊंडचा वापर करणार नाहीत, दहिहंडीच्या ठिकाणी प्रथमोपचाराचे साहित्य तसेच म्बुलन्स उपलब्ध ठेवावी, देशातील जातीय स्थितीचा विचार करून बाहेरून येणारे शक्तीकडून व समाजकंटकांकडून विघातक कृत्य करण्याची शक्यता असल्याने आपले स्वयंसेवक नेमावेत, देखावा पाहण्यासाठी येणारे महिला व पुरुष यांच्या वेगवेगळया रांगा कराव्यात.

गणपती आगमन व विसर्जन मिरवणुकीमध्ये गुलालाची उधळण न करता फुलांच्या पाकळयांचा वापर करावा, पावसाळया दिवस असल्याने मंडपास पत्र्याचे शेड मारून घ्यावे जेणेकरून पाऊस पडल्यास श्रीच्या मुर्तीवर पाणी पडणार नाही, रात्रीच्या वेळी मूर्तीचे नुकसान होऊ नये यासाठी रात्रीसाठी स्वंयसेवक नेमावे, गणेशोत्सवाचे मिरवणुकीत डी जे डॉल्बी साऊंडचा वापर करणार नाहीत, गणेशोत्सव मंडपात सीसीटीव्ही लावणे, दिवसा व रात्रीसाठी स्वंयसेवक नेमणे, विद्युत रोषणाई करताना रोषणाई करणारा परवाना धारक आहे का याबाबत खात्री करावी, त्यास वेळोवेळी विद्युत रोषणाई तपासून जाण्याबाबत सूचना द्याव्यात

### शांतता कमिटीच्या बैठकीत मार्गदर्शन

**रस्ता दुरुस्तीबाबत संबंधिताना सूचना देण्यात आल्या, एम एस ई बी च्या अधिकारी यांनी ओव्हर हेड वायर बाबत व लाईट सुरळित करणेबाबत योग्य ते नियोजन करावे, अग्निशामक दलाने देखील योग्य ते नियोजन करावे. पोलीस मदतीसाठी डायल ११२ क्रमांकाचा जास्तीत जास्त वापर करावा. बैठकीमध्ये उपस्थितांच्या अडी-अडचणी समजावून घेवून त्यांचे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यामार्फत निरसन करून त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे.**

कोणत्याही धर्माच्या भावना दुखावतील असे आक्षेपार्ह देखावे, फलक व चित्रफिती करू नये. सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना योग्य ती काळजी घ्यावी, एक खिडकी योजना राबविण्यात यावी यासाठी ज्या ठिकाणी ही योजना राबविली जात आहे, तेथील माहिती घेऊन कार्यवाही करण्यात यावी अशा सूचना देण्यात आल्या.

या बैठकीस सुर्यकांत कांबळे पोलीस निरीक्षक (गुन्हे), मधुकर भटे पोलीस निरीक्षक उरण वाहतुक, झुंबर माने नगर अभियंता उरण नगरपरिषद, विजय सोनवळे कार्यकारी अभियंता एम.एस.ई.बी कार्यालय उरण, यज्ञेश म्हात्रे सहाय्यक कार्यकारी अभियंता सिडको, विजय गोसावी अग्निशमन यांच्यासह शांतता कमिटी व मोहल्ला कमिटी सदस्य, दहिहंडी व गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, पोलीस पाटील, सरपंच, महिला दक्षता कमिटी सदस्य, सागरी सुरक्षा रक्षक दल, पत्रकार असे १२५ ते १५० नागरिक उपस्थित होते. ही बैठक शांततेत झाली.

# नवी मुंबईत बेकायदा वास्तव्य करणारे ताब्यात



- सर्व संशयित ठिकाणी धाडसत्र
- १५ पेक्षा अधिक जणांची धरपकड

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गृह मंत्रालयाने दिलेल्या आदेशानुसार नवी मुंबईत सर्वत्र बेकायदा राहणाऱ्या विदेशी नागरिकांच्या विरोधातधाडसत्र सुरू केले आहे. ज्यांची व्हिसाची मुदत संपली आहे अशा सर्वांची झाडाझडती सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणी १५ पेक्षा अधिक विदेशी नागरिकांना ताब्यात घेतले आहे. यात सर्वाधिक नागरिक हे आफ्रिका खंडातील देशांचे आहेत.

वाशीतील जुहू गाव, जुहू गाव खाडी परिसर, बोनकोडे खैरणे गाव तसेच पनवेल, खारघर परिसरातील शहरापासून नजीक असलेली गावे येथे शोधकार्य सुरू करण्यात आले आहे. या मध्ये वाशीतील जुहू गाव येथे पाच नायझेरिया देशाच्या नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर इतरत्र १० पेक्षा अधिक जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. यात मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता पोलिसांनी बोलून दाखवली. या नागरिकांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यावरच किती व्यक्ती बेकायदा भारतात वास्तव्य करतात हे समोर येईल असेही पोलिसांनी सांगितले.

याबाबत माहिती देताना गुन्हे शाखा उपायुक्त अमित काळे यांनी सांगितले की, हे धाडसत्र नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रात सर्वत्र सुरू आहे. पारपत्र कायद्यानुसार हि कारवाई सुरु आहे. यात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. सर्वत्र शोधाशोध सुरू असल्याने अद्याप कुठे कुठे आणि किती तसेच कुठल्या देशातील नागरिक पकडले गेले हे सांगू शकत नाही. कारवाई संपल्यावर सर्व माहिती समोर येईल.

# सिडको वॉटर प्लांटवरील विजेचे साहित्य चोरणाऱ्या दोघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

खारघर सेक्टर-१६मधील सिडकोच्या एमबीआर वॉटर प्लांटच्या जागेवर ठेवण्यात आलेला विजेच्या साहित्याचा कंटेनर फोडून त्यातील तब्बल १३ लाख ५० हजार रुपये किमतीचे विजेचे साहित्य चोरणार्या टोळीतील दोघांना सिडकोच्या सुरक्षारक्षकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.या टोळीतील इतर पाच साथीदार कंटेनरमधील विजेचे साहित्य टेम्पोतून घेऊन पळून गेले आहेत.


बीएनसी पॉवर प्रोजेक्ट लि. कंपनीने सिडकोच्या लाइन डायव्हर्शनचे मोनोपोल उभारण्याचे काम घेतले आहे. सध्या गोल्फ कोर्स येथे त्यांचे काम सुरू आहे. पावसाळा असल्याने कंपनीतर्फे हे काम तात्पुरत्या स्वरूपात बंद केले आहे. खारघर सेक्टर १६ मधील सिडकोच्या एमबीआर वॉटर प्लांटवर पाण्याची टाकी असल्याने तेथे सिडकोचे सुरक्षा रक्षक तैनात असल्यामुळे बीएनसी पॉवर कंपनीने चार महिन्यांपासून कामासाठी आणलेल्या पोलच्या व विजेच्या साहित्याचा कंटेनर खारघर सिडकोच्या एमबीआर वॉटर प्लांटच्या जागेवर ठेवला. हाच कंटेनरगोवंडी येथून आलेल्या टोळीने फोडला.

या वेळी टोळीतील पाचजणांनी कंटेनरमधील तब्बल १३ लाख ५० हजार रुपये किमतीच्या विजेच्या साहित्याचा माल मोठ्या टेम्पोत भरून पलायन केले. त्यानंतर मोहम्मद हसन जावेद शेख (वय २८) व विनोद भगवान लोखंडे (वय ३०), हे दोघे छोटा टेम्पोत इतर माल चोरी करून भरत असताना सुरक्षारक्षकांनी दोघांना पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. खारघर पोलिसांनी त्यांना अटक करून त्यांनी चोरीचे साहित्य नेण्यासाठी आणलेला टेम्पो जप्त केला आहे. तसेच अन्य साथीदारांचा शोध सुरू आहे.

# नवी मुंबईत ताप, खोकला, अंगदुखीचे रुग्ण वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत जुलै महिन्यामध्ये मुसळधार बरसलेल्या पावसाने ऑगस्टमध्ये मात्र उसंत घेतली. या वातावरण बदलामुळे विषाणूसंसर्गाचे रुग्ण नवी मुंबई परिसरात वाढले आहेत. खासगी रुग्णालयांसह पालिकेच्या रुग्णालयात ताप, खोकला, अंगदुखी आदी लक्षणे असलेल्या रुग्णांची संख्या वाढली आहे.





वातावरणात सध्या कमालीचा बदल झाला आहे. कधी पाऊस, तर कधी ऊन पडत असल्यामुळे संसर्गजन्य आजारांत वाढ झाली आहे. अशा वातावरणात डासांचा प्रादुर्भाव वाढला असून साथीचे आजार बळावले आहेत. वयोवृद्ध तसेच लहान मुलांची प्रतिकारक्षमता कमी असल्याने बदलत्या वातावरणाचा सर्वाधिक धोका त्यांना आहे. त्यामुळे रुग्णालयांमध्ये थंडीताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी आदी आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे.

पावसाळ्यात नवी मुंबई महापालिका क्षेत्रामधील प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून घरात व सभोवतालच्या परिसरात पाणी साचणार नाही, याची दक्षता घ्यावी. हिवताप, डेंग्यूची लक्षणे आढळल्यास महापालिकेच्या नजिकच्या प्राथमिक नागरी आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा व महापालिका रुग्णालयात वैद्यकीय सेवा घ्यावी. पालिकेमार्फत गृहभेटी देणाऱ्या हिवताप कर्मचाऱ्यास संपूर्ण सहकार्य करावे.

दरम्यान, नागरिकांनी आजार अंगावर न काढता डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत, असे आवाहन डॉक्टरांनी केले आहे.

### वेळेवर औषधोपचार घेण्याचे आवाहन

*शहरात सध्या डोळ्यांच्या साथीचे रुग्णही वाढत आहेत. २७ जुलैपासून आतापर्यंत डोळे आल्याचे एक हजार ५७८ रुग्ण आढळून आले आहेत. वातावरणबदलामुळे साथींचे रुग्ण आढळून येत आहे. लोकांनी आजार अंगावर न काढता डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार घ्यावेत. नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. ताप कमी न झाल्यास तत्काळ रक्ततपासणी करून घ्यावी, असा सल्ला जनरल फिजिशिअन डॉ. प्रतीक तांबे यांनी दिला आहे.*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विषयावर कार्यशाळा

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग अंतर्गत कोंकण ज्ञानपीठ उरण कॉलेज ऑफ कॉमर्स अँड आर्ट्स, सर्वांकष शिक्षण शास्त्र महाविद्यालय चेंबूर आणि बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स सायन्स पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल एज्युकेशन पॉलिसी २०२० रोड मॅप फॉर टीचर्स डेव्हलपमेंट या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. चंद्रशेखर चक्रदेव सर्वांकर शिक्षण शास्त्र महाविद्यालय चेंबूर आणि प्राचार्य के.के.भोईर बार्न्स कॉलेज पनवेल, डॉ. शिवदास कांबळे सिइओ बार्न्स कॉलेज पनवेल, डॉ. बळीराम एन. गायकवाड कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय उरण यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलनाने झाले. उद्घाटनावेळी डॉ.चंद्रशेखर चक्रदेव, डॉ. बळीराम गायकवाड सर यांनी नॅशनल एज्युकेशन पॉलिसीवरती प्रकाश टाकला. सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. बार्न्स कॉलेज सीईओ. डॉ. शिवदास कांबळे उपस्थित होते.

या कार्यशाळेसाठी रायगड जिल्हा समन्वयक म्हणून प्रो. डॉ. बी. एस. पाटील सी के टी महाविद्यालय पनवेल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हटले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अतिशय चांगले आहे, या कार्यशाळेसाठी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. चंद्रशेखर चंद्रराव उपस्थित होते. त्यांनी शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक आणि शासन यांच्या सर्वांच्या जबाबदाऱ्या आणि शिक्षणातील प्रगती, शिक्षणातील बदल याविषयी अतिशय उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले.




कार्यशाळेचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम गायकवाड यांनी भूषवले. त्यांनी २०२० शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या हिताचे असून प्राध्यापकांना अद्यावत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले.डॉ.शिवदास कांबळे व प्रा. के. डी. शारा व प्रा. व्हि. एस. इंदुलकर यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. डॉ. पी. आर. कारुळकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक आणि सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. हर्षदा लोखंडे यांनी केले. कार्यशाळेसाठी आय. क्यूएसी समन्वयक डॉ. ए.आर. चव्हाण उपस्थित होते. मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत सहभाग नोंदवला.

# प्राचार्य राजेंद्र पालवे यांना राज्य पुरस्कार घोषित

**कळंबोली : बातमीदार**

शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावून भावी पिढी सक्षम करणाऱ्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बाजीराव पालवे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक गुण गौरव पुरस्कार शासनाच्या शिक्षण विभागाने जाहीर केला आहे. रायगड



जिल्ह्यातून ते एकमेव राज्य पुरस्कार प्राप्त करणारे आदर्श शिक्षक आहेत.राज्य पुरस्कार चे वितरण पाच सप्टेंबरला मुंबई येथे भव्य समारंभात करण्यात येणार आहे. पुरस्कार घोषित झाल्याबद्दल सामाजिक, शैक्षणिक सांस्कृतिक, राजकीय व शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

शासनाच्या शिक्षण विभागाकडून शिक्षण क्षेत्रात योगदान देऊन मोलाची कामगिरी करून शासनाच्या विविध योजनांचे अंमलबजावणी करणाऱ्यांना राज्य पुरस्काराने सन्मानित केले जाते. सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्या संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बाजीराव पालवे यांना यावर्षीचा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य पुरस्कार शासनाच्या वतीने शुक्रवारी सायंकाळी जाहीर करण्यात आला आहे. उल्लेखनीय कामाबद्दलच राजेंद्र पालवे यांची सावित्रीबाई फुले राज्य पुरस्कारासाठी निवड केली आहे. त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबईतून मुलुंड-ऐरोलीमार्गे दिघा येथे जाणाऱ्या तरुणाच्या दुचाकीला वाहनाने धडक दिल्याने झालेल्या अपघातात तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि. ३१) रात्री मुलुंड ऐरोली पुलावर घडली. रबाळे पोलिसांनी या अपघातप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

अवनिंद्र राघव विश्वकर्मा (वय २६) असे अपघातातील मृत तरुणाचे नाव असून तो दिघा, सुभाष नगर येथे कुटुंबासह राहण्यास होता. अवनिंद्र रबाळे एमआयडीसीमध्ये खासगी कंपनीत काम करत होता. गुरुवारी सायंकाळी तो मुंबईत गेला होता. त्यानंतर रात्री १० वाजण्याच्या सुमारास तो मुलुंडमार्गे दिघा येथे घरी जात होता. तो मुलुंड ऐरोली पुलावर आला असताना अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात अवनिंद्र गंभीर जखमी झाल्याने त्याला ऐरोलीतील इंद्रावती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. या ठिकाणी उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

## युगांता भोईर बनली हवाई सुंदरी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील दारावे गावाचे रहिवासी किशोर राजाराम भोईर यांची कन्या युगांता किशोर भोईर हिची नुकतीच इंडिगो एअरमध्ये हवाई सुंदरी म्हणून निवड झाली आहे. तिच्या या कामगिरीबद्दल संपूर्ण दारावे गाव परिसरात तिचे कौतुक होत आहे. या निमित्ताने भाजपचे माजी नगरसेवक सुनील पाटील यांनी भोईर यांच्या राहत्या घरी जाऊन युगांताचे अभिनंदन केले.

या वेळी सामाजिक कार्यकर्ते गणेश पाटील, शरद पाटील, अंकुश भोईर, भालचंद्र भोईर, पंढरीनाथ भोईर, मनोज नाईक आदी उपस्थित होते. या वेळी माजी नगरसेवक सुनील पाटील यांनी सांगितले की युगात त्याच्या यशाने दारावे गावचे नाव लौकिक केले असून भोईर कुटुंबीयांची शान वाढवली आहे. तिने केलेल्या तिच्या कामगिरीबद्दल अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सोनाराच्या दुकानात बुरखा घालून चोरी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सोन्याच्या पेढीत दागिने पाहण्याच्या निमित्ताने आलेल्या काही महिलांनी तीन तोळे वजनाच्या दोन बांगड्या चोरी केल्याचे समोर आले आहे. ही घटना १० ऑगस्ट रोजीची असून पेढीतील नियमित ऐवज तपासणी करीत असताना बांगड्या आढळून आल्या नाही. सीसीटीव्ही तपासणी केली असता हा प्रकार उघडकीस आला. मांगी हिम्मतराम माली असे यातील फिर्यादीचे नाव आहे. ते वाशीतील मयुरा ज्वेलर्समध्ये काम करतात.

१० ऑगस्ट रोजी त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान उघडले. दिवसभर सोन्याचे दागिने विक्री करण्याचे नियमित काम झाल्यावर रात्री साडे नऊच्या सुमारास दुकान बंद करून घरी गेले. दुकान बंद केल्यावर दागिन्यांची पडताळणी केली असता शिल्लक दागिन्यांमध्ये अंदाजे तीन तोळ्याच्या दोन बांगड्या मिळुन आल्या नाही. दुसऱ्या दिवशी शुक्रवार असल्याने दुकानाला सुट्टी होती, त्यामुळे घटनेकडे दुर्लक्ष झाले. मात्र १२ तारखेला सीसीटीव्ही तपासणी केली असता १० तारखेला दुपारी सव्वादोनच्या सुमारास तीन बुरखाधारी महिला दुकानात आल्या. त्यांनी सोन्याच्या बांगड्या खरेदी करायच्या आहेत, असे सांगितल्याने दुकानातील अनिल जैन यांनी त्यांना सर्व प्रकारच्या बांगड्या दाखवल्या. त्यानंतर त्यातील एका महीलेने त्या बांगड्या तिच्या हाताखाली लपवुन ठेवल्या.

तिने नंतर त्या बांगड्या बुरख्याच्या आत लपवल्या. त्याचवेळी दुसऱ्या व तिसऱ्या महीलेने दुकानदाराला बोलण्यात गुंतवुन ठेवले होते. दुकानातुन दोन सोन्याच्या एकूण तीन तोळ्याच्या बांगड्या चोरी झाल्याचे समोर आले आहे. एकूण १ लाख ९५ हजार रुपये किंमतीच्या २२ कॅरेटच्या तीन तोळे वजनाच्या दोन बांगड्या चोरीला गेल्या. या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून २९ ऑगस्ट रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.




## आल्या नाचत श्रावण धारा

लपाछपी सूर्याशी खेळत,
भूमीस भेटण्या आल्या धावत।
क्षणात येवूनी झाल्या गुप्त,
त्यांसी शोधितो वारा ।।१।।

या धारांची वाट पाहती,
छोटे जीव अन, गवतफुले ती।
शेतकऱ्याची काळी शेती,
बीज फोडिती अंकुरा ।।२।।

सुवासिनींची लगबग चाले,
जिवतीस प्रार्थीती रक्षी बाळे।
श्रावण धारा जल समर्पिले,
शिव शंभो महादेव शंकरा।।३।।

श्रावणधारा यथेच्छ बरसली,
पृथ्वी सारी हिरवी नटली।
शाहीर कवींनी कवने गायीली,
आनंद घुमतो घरा घरा।।४।।



-प्रवीण श्रीराम देशमुख, कल्याण

# मुरुड नांदगाव किनारी चरसची पाकिटे




(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

रत्नागिरीनंतर रायगड जिल्ह्यातील समुद्राकिनारी गेल्या काही दिवसांपासून चरस या अमली पदार्थाची पाकिटे आढळत आहेत. अशाच प्रकारे मुरुड तालुक्यातील नांदगाव किनारी समुद्रातून वाहून आलेली दोन चरसची पाकिटे आढळून आली आहेत. पोलिसांनी ती ताब्यात घेतली आहे.

वेगवेगळ्या समुद्रकिनाऱ्यांवर सातत्याने चरसची पाकिटे आढळत असल्याने रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी प्रत्येक पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या किनाऱ्यावर रोजच्या रोज गस्त घालण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मुरुड पोलीस ठाण्याच्या निरीक्षक निशा जाधव यांच्यामार्फत नांदगाव समुद्राकिनारी शोधमोहीम सुरू असताना चरसची दोन पाकिटे बेवारस व भिजलेल्या स्थितीत आढळून आली. या पाकिटांवर गरुड आणि नागाचे चित्र असून त्यावर अफगाण प्रोडक्ट असे इंग्रजी अक्षरात लिहिलेले आहे. त्यामुळे या प्रकाराचे धागेदोरे थेट अफगाणिस्तानपर्यंत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. या पाकिटांचे वजन दोन किलो १८४ ग्रॅम असून त्यांची अंदाजे किंमत आठ लाख ७३ हजार ६०० रुपये आहे.

रायगड जिल्ह्यात समुद्रकिनाऱ्यांवर चरसची पाकिटे आढळत आहेत. याबाबत असा संशय व्यक्त करण्यात येत आहे की, एखादी बोट हा माल किनाऱ्याला घेऊन येणार होती, मात्र सुरक्षा यंत्रणेची बोट समोर दिसताच हा माल समुद्रात फेकून देण्यात आला असावा. म्हणूनच किनारी ही पाकिटे आढळून येत आहेत.

या वेळी पोलीस निरीक्षक निशा जाधव, तहसीलदार रोहन शिंदे, नांदगाव तलाठी अरविंद देशमुख, ग्रामपंचायत क्लार्क मुकेश मिटकर, पोलीस पाटील विश्वास महाडीक, पोलीस सुरेश वाघमारे, परेश म्हात्रे व पथक उपस्थित होते.

**पोलिसांचे नागरिकांना आवाहन**

मुरुड पोलीस निरीक्षक निशा जाधव यांनी समुद्राकिनारी राहणाऱ्या व फिरण्यास येणाऱ्या नागरिकांना आवाहन केले की, किनाऱ्यावर आढळलेली बेवारस वस्तू घरी घेऊन न जाता ती पोलीस ठाण्यात जमा करावी. चुकून तुम्ही नेलेली वस्तू चरस हा अमली पदार्थ आढळल्यास संबंधितांवर कडक कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे.



रोह्यात रानभाजी, तृणधान्य व खाद्यपदार्थ महोत्सव

# कृषी विभागाने महिला शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजना पोहचवाव्यात

■ खासदार सुनील तटकरे यांचे आवाहन



**रोहे : प्रतिनिधी**

उत्पादन करणारा शेतकरी व खरेदी करणारे ग्राहक यांची सांगड राजभाज्या महोत्सवाच्या माध्यमातून घालण्यात येत आहे. महिला शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना पुरविण्याचे काम कृषी विभागाने करावे, असे आवाहन खासदार सुनील तटकरे यांनी शनिवारी (दि. २) केले. रोह्यातील भाटे सभागृहात आयोजित रानभाजी महोत्सव उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

शहरात रानभाजी महोत्सव भरविल्याने मला समाधान वाटते. आज रानभाज्यांकडे आपण वळलो आहे. रानभाज्या शरीराला उपयुक्त आहेत. खतविरक्त या भाज्या असल्याने शरीराला उपयुक्त आहे. असे महोत्सव भरवून राज्य सरकारने शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे ठरवले. यामुळे सर्वत्र महोत्सव भरविण्यात येत आहे. नाचणी, बाजरी पिके शरीराच्या वाढीसाठी पूरक आहेत. आरोग्याचे संरक्षण करण्याचे काम सेंद्रिय अन्यधान्य व रानभाज्याच्या खाद्यपदार्थांमुळे होत आहे. रोह्यातील शेतकऱ्यांनी कलिंगड पिकात मगरबंधूंचे काम वाखाण्याजोगे आहे, असे खासदार तटकरे यांनी म्हटले.

जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी प्रास्ताविकात पावसाळ्यात रानभाज्या सर्वत्र होत असतात. पौष्टिक तृणधान्य व भाजीपाल्याचा समावेश खाण्यात करण्याची आवश्यकता आहे. रोहा तालुका कृषी विभाग रायगड जिल्ह्यात अग्रेसर असून जिल्ह्यात सर्वत्र रानभाज्या महोत्सव होत आहे, असे सांगितले.

उद्घाटन समारंभास राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, सरचिटणीस सुरेश मगर, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवल, तहसीलदार किशोर देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, सुशील रेळेकर, रामचंद्र सकपाळ, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, गटनेते महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, गणेश भगत, अनंत मगर, दगडू बामुगडे आदी उपस्थित होते.

या रानभाजी महोत्सवात टाखारी, आकुड, पल्हाद, गेमिटी, सेवळा, सच्याचे, कान, कुरडू, फापट, लोत, भोवरी, तेरी, भांबाडी, भोकर, सारी, टाकळा, खरचिंग, भारंग, कर्टुली आदी भाज्यांचा समावेश होता. त्याचप्रमाणे या वेळी तृणधान्य व खाद्यपदार्थ महोत्सव भरविण्यात आला.

# रोहा-चणेरा मार्गावर कार पेटली

■ सुदैवाने जीवित हानी नाही



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोहा-चणेरा मार्गावर एका स्विफ्ट कारने शुक्रवारी (दि. १) रात्री अचानक पेट घेतला. प्रसंगावधान राखून गाडीतील प्रवासी बाहेर आल्याने कोणतीही जीवित हानी झाली नाही

शिफ्ट कार (एमएच ०४ डीआर ३८८२)मधून एक कुटुंब मुरुड काशीद बीचकडून रोह्याकडे येत होती. गोफण गावाजवळ असलेल्या हॉटेल योगिताहीरानजीक रात्री ८च्या सुमारास या कारने अचानक पेट घेतला. यामुळे एकच खळबळ उडाली. गाडीतून प्रवास करणारे कुटुंब वेळीच बाहेर पडल्याने सुदैवाने जीवित हानी टळली.

या वेळी योगिताहिरा हॉटेलमधील कर्मचारी अन्य वाहनधारक आणि उपस्थित लोकांनी शर्थीचे प्रयत्न करुन अखेर आग विझविण्यात आली. अग्निशमन दलाचे बंबही घटनास्थळी पोहचले होते. या आगीत गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

## कृषी संशोधन केंद्राची ओसाड जमीन हालिवलीच्या तरुणांना भाडेतत्वावर द्यावी

**कर्जत : प्रतिनिधी**

हालिवली गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर कोकण कृषी विद्यापीठाचे कर्जत भात संशोधन केंद्र उभे आहे.

**ग्रामपंचायतीची मागणी**



(छाया : विजय मांडे)

या भात केंद्राकडून वापरात नसलेल्या रस्त्याच्या कडेची जमीन हालिवली गावातील तरुणांना रोजगार व्यवसायासाठी भाडेतत्वावर देण्याची मागणी हालिवली ग्रामपंचायतीने ठराव घेऊन केली आहे. या मागणीचे निवेदन सरपंच प्रमिला बोराडे यांनी भात संशोधन केंद्राला दिले आहे.

स्थानिकांच्या मागणीचे निवेदन कृषी संशोधन केंद्राच्या अधिकाऱ्यांची भात केंद्रात जाऊन भेट घेत देण्यात आले. सोबत ग्रामपंचायतीने केलेल्या ठरावाची प्रतदेखील भात केंद्राला दिला गेला असून रस्त्याच्या कडेची जमीन केंद्राने स्थानिकांना व्यवसाय करण्यासाठी द्यावी, अशी आग्रही मागणी गावकऱ्यांची आहे.

# रोह्यात दहीहंडीची जोरदार तयारी

## गोविंदा पथकांचा कसून सराव

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरात गोकुळाष्टमी उत्सव पारंपारिक पद्धतीने आजही साजरा केला जातो. याही वर्षी या उत्सवाची तयारी गोविंदा पथक करीत आहेत. विशेष आकर्षण खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या नियोजनातून सुनील तटकरे युवा प्रतिष्ठानच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या लाखो रुपये बक्षीस असलेल्या दहीहंडीची तयारीही सुरू आहे.

रोहा शहरातील अंधारआळी, धनगरआळी, बंगलेआळी मोरेआळी, संत गोरोबा नगर दमखाडी, ब्राह्मण आळी या आळीत गोकुळाष्टमी सण मोठा उत्साहात साजरा केला जातो. दुपारपर्यंत आपल्या आळीतील हंडी फोडल्यानंतर रोहा शहरात हे गोविंदा येत असतात. शहरातील व्यापारी बंधूंनी बांधलेल्या व काही राजकीय पक्षांनी बांधलेल्या हंड्या गोविंदा पथके फोडतात. यासाठी पथकांनी सराव सुरू केला आहे. संरक्षण जॅकेट, हेल्मेट व टी-शर्ट छापून आले असून बहुतांशी पथकांनी आपल्या गोविंदांचा विमा उतरवला आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गोविंदांच सराव सुरू आहे. निडी, निवी, रोठ खुर्द, देवकाने, लांढर, बोरघर, तळाघर आदींसह अन्य भागात गोविंदा पथके सराव करताना दिसत आहेत. काही पथकांनी आठ थर लावण्याचा सराव सुरू केला आहे व ते यशस्वी होताना दिसत आहेत.

रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत १५७ सार्वजनिक व एक खासगी, नागोठणे हद्दीत सार्वजनिक ५२, खासगी २३५, राजकीय एक, तर कोलाड हद्दीत खासगी ५५, सार्वजनिक २५ दहीहंडी लावण्यात येणार आहेत.



# चला तर, मृत्यूनंतरही माणुसकी जिवंत ठेवूया... अवयवदान करूया!

भारतीय संस्कृतीत दान या शब्दाला खूप महत्त्व आहे. त्यापैकी रक्तदान, नेत्रदान याविषयी समाजात बऱ्यापैकी जनजागृती झाली आहे. शासनाच्या विविध राष्ट्रीय कार्यक्रमांपैकी अवयवदान हासुद्धा राष्ट्रीय उपक्रम देशात राबविण्यात येतो. आजपावेतो वैज्ञानिकांनी आपापल्या क्षेत्रात भरपूर संशोधन करून नवनवीन शोध लावले आहेत आणि अजूनही काही शोध लावण्याच्या प्रयत्नात आहेत.

सन १९५४ साली पहिल्यांदा अवयवदान करण्यात आले त्या वेळी रोनाल्ड ली हेरिकने किडनी दान करून स्वतःच्या भावाला नवजीवन दिले. त्याचवेळी डॉ. जोसेफ मरे यांनीही पहिल्यांदाच किडनी प्रत्यारोपण केले. या मानवतावादी कार्यासाठी डॉ. जोसेफ मरे यांना १९९० साली शरीरशास्त्रातील नोबेल पारितोषिक देण्यात आले.

दरवर्षी १३ ऑगस्ट रोजी अवयवदानाविषयी जनजागृती करण्यासाठी, त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी, लोकांमधील भिती दूर होण्यासाठी जागतिक अवयवदान दिवस जगभरात विविध उपक्रमांनी साजरा केला जातो तसेच हा दिवस लोकांना मृत्यूनंतर त्यांचे निरोगी अवयव गरजू व्यक्तीला दान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न करतो. मूत्रपिंड, हृदय, स्वादुपिंड, डोळे, फुफ्फुसे, त्वचा इत्यादी अवयवदान केल्याने दीर्घ आजारांनी ग्रस्त लोकांचे प्राण वाचविले जाऊ शकतात. निरोगी अवयवांच्या अनुपलब्धतेमुळे अनेक लोक आपले प्राण गमावतात. अवयवानामुळे आपण त्यांचे प्राण वाचवू शकतो. व्यक्ती वयाच्या १८ वर्षांपासून ते ६४ वर्षापर्यंत अवयवदान करता येऊ शकते.

पृथ्वीवर कोणतीही गोष्ट, वस्तू वाया जात नाही. एखाद्या रुग्णाबाबत एखाद्या अवयवावरील औषधोपचार संपल्यावर डॉक्टरांचा शेवटचा सल्ला असतो तो म्हणजे ऑर्गन ट्रान्सप्लांट म्हणजेच अवयव प्रत्यारोपण. एखाद्याच्या शरीराचा निकामी झालेला अवयव उदा. किडनी, यकृत, डोळे, हृदय, त्वचा इ.शस्त्रक्रियेव्दारे प्रत्यारोपण करून त्याजागी दान केलेला संबंधित अवयवाचे वैद्यकीय सल्ल्यानुसार मानवी शरीरात प्रत्यारोपण केले जाते. मानवाचे प्राण वाचविण्यासाठी मानवी अवयवदान अत्यंत महत्त्वाचे ठरते.

अशा प्रकारे गरजू व्यक्तीची निकामी अवयवाची गरज पूर्ण होण्यासाठी जनजागृती करून जीवनदान दिले जाते. समाजात अवयवदानाविषयी मार्गदर्शन तसेच जनजागृती होणे आवश्यक आहे. आपल्या घरातील व्यक्तीला अपघात, शस्त्रक्रिया इ.वेळेस जेव्हा तातडीची गरज पडते तेव्हा खऱ्या अर्थाने याची जाणीव होते. प्रत्येकाला आपल्या रुग्णाचा जीव वाचवायचा असतो. यासाठी प्रत्येक जण आपापल्या परीने प्रयत्न करीत असतो. पण नाईलाज असतो ? कारण पैसा, औषध, इ. बाबी आपण धावपळ करून उपलब्ध करू शकतो. पण एखादा दुसऱ्या मनुष्याचा अवयव आणणे तसेच घरातील आपल्याच नातेवाईकांना अवयवदान करण्यासाठी प्रवृत्त करणे, हे मात्र कठीण काम आहे. कारण पैसा, औषध अशा गोष्टीसाठी मदत कुणीही करेल, पण अवयवाची मदत कुणीही करू शकणार नाही. याला कारण देखील तसेच आहे, समाजात याविषयी जनजागृती होणे, याविषयीचे गैरसमज दूर होणे, अत्यावश्यक आहे, ही काळाची गरज आहे. यासाठी शासन, स्वयंसेवी संस्था आदींच्या माध्यमातून मानवाच्या अवययदानाचे महत्त्व, याविषयीचे मार्गदर्शन, फायदे, कार्यपद्धती आदी विषयांबाबत समुपदेशन व जनजागृती होणे आवश्यक आहे.

अवयवदानाचे महत्त्व:- शरीरातील कोणताही अवयव निरुपयोगी होणे, म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचे शारीरिक, आर्थिक, मानसिक स्वास्थ्य नष्ट होणे. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक परिस्थिती देखील हलाखीची होऊन जाते. शरीरातील एखादा अवयव निरुपयोगी होण्यामुळे मूत्रपिंड, यकृत, हृदय, फुप्फसे अशा अनेक भागांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. वेगवेगळ्या आजारांमुळे आपल्या देशात दरवर्षी साधारणतः अनेक लोक बळी पडतात. यातील अनेकांचा मृत्यू हा शरीरातील एखादा महत्त्वाचा अवयव निकामी झाल्यामुळे होतो. मात्र अवयदानामुळे अनेकांचा जीव वाचविला जाऊ शकतो.



नातेवाईकांची संमती आवश्यक:-देशात दररोज अपघातात अनेक लोकांचा मृत्यू होत असतो. एखाद्याचा अपघात झाल्यानंतर संबंधितास दवाखान्यात उपचारासाठी दाखल केल्यानंतर कधीकधी त्या रुग्णास ब्रेनडेड घोषित केले जाते. अशा वेळेस डॉक्टर तसेच तज्ज्ञांकडून त्या रुग्णाच्या घरातील व्यक्तीला, नातेवाईकांना समजावून, आपल्यामुळे दुसऱ्याला जीवनदान मिळण्यासाठी अवयवदानाबाबत समुपदेशन केल्यास आवश्यक अवयवदान करता येऊ शकते. ज्यामुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळू शकते. अशा वेळी त्यांच्या स्वैच्छिक अवयवदानाने इतर लोकांना जीवनदान मिळू शकते. शासन तसेच शासनमान्यता विभागामार्फत काढलेल्या अवयवांचे ६ ते ७२ तासात पुनर्रोपण करण्यात येते. एक अवयवदाता कमीत कमी आठ लोकांचे जीव वाचवू शकतो. जिवंत असताना यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, स्वादुपिंड, हृदय, त्वचा आणि आतडे इ.अवयवांचे दान करता येते.

जे शरीर आपण आपल्या मरणानंतर नष्टच होणार आहे, मग अवयवदानाने एखाद्या व्यक्तीला जीवनदान मिळत असेल तर आपण स्वतःहून अवयवदानाची समाजात जनजागृती करण्यात गैर काय? ही जनजागृती सामान्य जनतेपर्यंत जोपर्यंत पोहचणार नाही तोपर्यंत अवयवदान हे दानदेखील माणुसकीच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे, हे समाजाला आपण पटवून दिले पाहिजे. प्रत्येक मानवाने सामाजिक बांधिलकी म्हणून अवयवदानासाठी पुढे येऊन आपल्या जवळच्या शासनमान्यताप्राप्त अवयवदान केंद्रात नोंदणी करणे आवश्यक आहे. मरणोत्तर निरोगी नेत्र, यकृत, किडनी, शरीराचे विभिन्न भाग इ.स्वयंस्फूर्तीने दान करू शकता. अवयवदान हे आजच्या युगात गरजू रुग्णांसाठी नक्कीच आशेचा किरण ठरणार आहे यासाठी शासनस्तरावरून मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जात आहे. आपल्या शरीरातील अवयव वेळप्रसंगी गरजू रुग्णांना जीवनदान देऊ शकेल...!

अवयवदानाचा उपदेश करणे, अवयवदान संमतीपत्र भरून देणे सोपे आहे, परंतु जेव्हा अवयवदान करण्याची प्रत्यक्ष वेळ येते तेव्हा मात्र अवयवदानाविषयी केलेला निश्चय गळून पडतो... ज्या कुटुंबातील व्यक्ती ब्रेन डेड असते किंवा ती व्यक्ती मरण पावते तेव्हा साहजिकच सर्व कुटुंबीय दुःखात बुडालेले असतात,अशा दु:खद प्रसंगी त्या कुटुंबीयांचे समुपदेशन करणे हे अत्यंत अवघड काम डॉक्टर आणि समुपदेशक यांना करावे लागते.

समुपदेशन करणारे जे सेवाभावी कार्यकर्ते असतात त्यांना शासनातर्फे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. अवयवदान संमतीपत्र भरणारे अवयवदान करतीलच याची खात्री नसते. वचनपत्र भरून देणे ही अवयवदानातील पहिली पायरी आहे, ज्यामुळे अवयवदानाचा सकारात्मक विचार त्या व्यक्तीच्या मनात येतो. कमीत कमी पहिल्या टप्प्यात तालुकास्तरावर प्रशिक्षित समुपदेशक तयार झाले तर अवयवदान प्रक्रिया सोपी होण्यास खूप मदत होईल.

अवयवदान या विषयावर जनजागृती होण्यासाठी अनेक मान्यवर मनापासून प्रयत्नशील आहेत. याविषयी आणखी सविस्तर माहितीसाठी आपण त्यांच्याशीही (माधव अटकोरे, नांदेड-८०८७५६५१७२, कुमार कदम ९८६९६१२५२६) संपर्क करू शकता. चला तर मग माणुसकीप्रति आपले कर्तव्य निभाविण्यासाठी आपणही अवयवदान संमतीपत्र भरून या चळवळीत सक्रिय सहभागी होऊया... मृत्यूनंतरही अवयवदानातून माणुसकी जिवंत ठेवूया...!

**-हेमकांत सोनार,**
अलिबाग-रायगड,

# ‘अमेरिकन ओपन’मध्ये अल्काराझची घोडदौड

## मेदवेदेव, सिन्नेर, पेगुला, जाबेऊरचीही आगेकूच



**न्यूयॉर्क : प्रतिनिधी**

गतविजेत्या स्पेनच्या कार्लोस अल्कराझने अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेतील आपली अपेक्षित घोडदौड कायम राखताना तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. अल्कराझने दुसऱ्या फेरीत लॉईड हॅरिसचे आव्हान ६-३, ६-१, ७-६ (७-४) असे सहज मोडून काढले.

अल्कराझच्या गटातून बहुतेक मानांकित खेळाडू आपले आव्हान राखून आहेत. त्याचवेळी दुसऱ्या गटातून नोव्हाक जोकोविचचा मार्ग अधिक सुकर होत आहे. जोकोविचचा समावेश असलेल्या गटातून चौथा मानांकित होल्गर रुन, पाचवा मानांकित कॅस्पर रुड, सातवा मानांकित स्टेफानोस त्सित्सिपास यांचे आव्हान संपुष्टात आले आहे. अल्कराझच्या गटातून तिसरा मानांकित डॅनिल मेदवेदेव, सहावा मानांकित यान्निक सिन्नेर, आठवा मानांकित आंद्रे रुब्लेव आणि १२वा मानांकित ॲलेक्झांडर झ्वेरेव हे आघाडीचे खेळाडू स्पर्धेत कायम आहेत.

माजी विजेत्या मेदवेदेवने ख्रिस्तोफर ओकेनेलला ६-२, ६-२, ६-७ (६-८), ६-२ असे, रुब्लेवने गेल मोंफिसला ६-४, ६-३, ३-६, ६-१ असे, तर कॅमरुन नॉरीने यू सु याला ७-५, ६-४, ६-४ असे पराभूत केले.

महिला एकेरीतून तिसऱ्या मानांकित जेसिका पेगुला आणि पाचव्या मानांकित ओन्स जाबेऊरने आगेकूच कायम राखली. दुसऱ्या फेरीत पेगुलाने पॅट्रिसिया मारिया टिगचे आव्हान ६-३, ६-१ असे सहज परतवून लावले. त्याचवेळी जाबेऊरला मात्र लिंडा नोस्कोवाचा प्रतिकार सहन करावा लागला. जाबेऊरने ७-६ (९-७), ४-६, ६-३ असा विजय मिळवला.

अमेरिकन टेनिस स्पर्धेत दुसऱ्या फेरीत पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर अमेरिकेच्या जॉन इस्नेरने व्यावसायिक टेनिसमधून चाहत्यांचा भावपूर्ण निरोप घेतला. आठवडाभरापूर्वीच इस्नेरने ही आपली अखेरची स्पर्धा असेल असे सांगितले होते. दुसऱ्याच फेरीत अमेरिकेच्याच मायकल ममोहकडून पाच सेटच्या मॅरेथॉन लढतीनंतर इस्नेरला ३-६, ४-६, ७-६ (७-३), ६-४, ७-६ (१०-७) असा पराभवाचा सामना करावा लागला. लढतीनंतर कोर्टवरच चाहत्यांशी संवाद साधताना इस्नेर अत्यंत भावूक झाला होता.



**पल्लेकेले (श्रीलंका) : आशिया चषक स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाची आघाडीची फळी लवकर तंबूत परतल्यानंतर इशान किशन आणि हार्दिक पांड्या यांनी डाव सांभाळला. हे दोघेही अर्धशतकी खेळी करून बाद झाले.**

# मुरूड तालुकास्तरीय शालेय पावसाळी क्रीडा स्पर्धा उद्यापासून



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुकास्तरीय शालेय पावसाळी क्रीडा स्पर्धा ४ ते १२ सप्टेंबरदरम्यान आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती तालुका क्रीडा समन्वयक महेश पाटील यांनी दिली.

स्पर्धेच्या आयोजनासाठी तहसीलदार रोहन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच तहसील कार्यालयात तालुक्यातील क्रीडा शिक्षकांची बैठक झाली. या बैठकीत क्रीडा स्पर्धेच्या तारखा, ठिकाण व संपर्कासाठी आवश्यक त्या शिक्षकांची नावे जाहीर करण्यात आली.

स्पर्धा १४, १७ व १९ वर्षे या वयोगटातील मुली व मुलांसाठी घेण्यात येणार आहे. ४ सप्टेंबरला १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुलांची कबड्डी स्पर्धा, ५ सप्टेंबर रोजी मुलींची कबड्डी स्पर्धा, ६ सप्टेंबरला मुले, मुलींसाठी बुध्दिबळ स्पर्धा श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, यशवंतनगर येथे होणार आहेत. ८ सप्टेंबरला मुले व मुलींसाठी व्हॉलीबॉल व कुस्ती स्पर्धा विहुरच्या मेहबूब इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये रंगणार आहे. खो-खो स्पर्धा ९ सप्टेंबरला मुरूडच्या सर एस.ए. हायस्कूल येथे होणार आहे. याशिवाय मुलांच्या अन्य मैदानी स्पर्धा सर एस. ए. हायस्कूलमध्ये ११ सप्टेंबर रोजी, तर मुलींच्या मैदानी स्पर्धा १२ सप्टेंबर रोजी याच हायस्कूलमध्येच होणार आहे.

स्पर्धेचे उद्घाटन ४ सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय, नांदगाव यशवंतनगर येथे तहसीलदार रोहन शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. ही पावसाळी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विविध शाळांतील क्रीडा शिक्षकांसह आशिष बुल्लु, दत्तात्रेय खुळपे, बालाजी घुगे, महेंद्र पाटील, सातमकर, हुजेफा, साहिल अन्सारी, मनोज सुर्वे, पवार आदी परिश्रम घेत आहेत.

# आशियाई क्रीडा स्पर्धेचे वेध

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१९व्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धेचे सामने चीनमधील हांगझोऊ येथे आयोजित करण्यात आले आहेत. सर्व सामने झेजियांग युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी ग्राउंडवर खेळले जातील.

चीनमध्ये होणाऱ्या आगामी आशियाई स्पर्धेत क्रिकेटचाही सहभाग आहे. यामध्ये भारतीय संघाने महिला आणि पुरुष संघाला पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय संघाची चांगली क्रमवारी असल्यामुळे थेट क्वार्टर फायनलचे तिकिट मिळाले आहे. बीसीसीआयने महिला आणि पुरुष दोन्ही संघाची घोषणा केली आहे. टीम इंडियाची धुरा ऋतुराजच्या हातात आहे तर महिला संघाचे नेतृत्वा हरमनप्रीत कौरच्या खांद्यावर आहे.

# बीसीसीआयचे मीडिया अधिकार ‘वायाकॉम १८’कडे

## ५,९६६.४ कोटींचा करार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रिलायन्स ग्रुपच्या वायकॉम १८ने पुढील पाच वर्षांसाठी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) मीडिया अधिकार सुरक्षित केले आहेत. बीसीसीआयने सप्टेंबर २०२३ ते मार्च २०२८ या कालावधीत नवीन चक्रासाठी मीडिया अधिकारांचा लिलाव आयोजित केला होता. क्रिकेट वेबसाइट क्रिकबझच्या अहवालानुसार हे अधिकार मिळवण्यात वायाकॉम १८ने बाजी मारली आहे. त्यानुसार बीसीसीआयला आता प्रती सामना ६७.८ कोटी असे पाच वर्षांत ५,९६६,४ कोटींची डील मिळाली आहे.

जिओ सिनेमा सर्व सामने ऑनलाइन लाइव्ह स्ट्रीम करेल आणि स्पोर्ट्स१८ ते टेलिव्हिजनवर प्रसारित करेल. पूर्वीचे अधिकृत प्रसारक स्टार स्पोर्ट्स नेटवर्क, पुढील महिन्यात ऑस्ट्रेलिया मालिका आणि ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारा आयसीसी एकदिवसीय विश्वचषक २०२३ प्रसारित करेल. क्रिकबझमधील एका अहवालानुसार वायाकॉम १८ पुढील पाच वर्षांसाठी भारताच्या देशांतर्गत आंतरराष्ट्रीय सामन्यांचे प्रसारण करण्यासाठी प्रति सामन्यासाठी डिजिटल आणि टीव्ही दोन्हीसाठी ६७.८ कोटी रुपये देईल.

हे हक्क दोन पॅकेजेसमध्ये विकले गेले. पॅकेज ए मध्ये इंडिया सबकॉन्टिनेंट टीव्हीचा समावेश होता, तर पॅकेज बी मध्ये इंडिया सबकॉन्टिनेंट डिजिटल प्लस वर्ल्ड टीव्ही आणि डिजिटल समाविष्ट होते. पॅकेज ए ची मूळ किंमत २० कोटी रुपये आणि पॅकेज बी साठी २५ कोटी रुपये ठेवण्यात आली होती. एकूण ८८ सामन्यांसाठी प्रत्येक गेमची एकत्रित आधारभूत किंमत ४५ कोटी रुपये होती.

२०१८मध्ये स्टार स्पोर्ट्स इंडियाने २०१८ ते २०२३ या कालावधीसाठी टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मसाठी ६१३८.१ कोटी रुपयांची बोली लावली होती, जी प्रति गेम सरासरी ६०.१ कोटी रुपये होती. त्यात सोनी स्पोर्ट्स नेटवर्ककडे आता झीसह एकत्रित २०२४पासून पुढील चार वर्षांसाठी आयसीसी विश्वचषकाचे टीव्ही हक्क घेतले आहेत.

२०१८-२०२३ या कालावधीत स्टार इंडियाने ६१३०.१० कोटी रुपयांत मीडिया हक्क जिंकले होते. त्यापेक्षा आताची रक्कम कमी वाटत असली तरी तेव्हा १००+ सामने होते आणि आता ८८ सामने आहेत. त्यानुसार पुढील पाच वर्ष बीसीसीआयला प्रतीसामना ६७.७ कोटी मिळतील. डिजिटल हक्क ३१०० कोटींना आणि टेलिव्हिजनचे हक्क २८६० कोटींचा विकले गेले आहेत. यामध्ये २५ कसोटी, २७ एकदिवसीय आणि ३६ टी-२० सामन्यांचा समावेश आहे.

# कॅनडा महिला क्रिकेट संघात तृतीयपंथी खेळाडूचा समावेश

**लंडन : वृत्तसंस्था**

कॅनडाची डॅनिएले मगेही आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळणारी पहिली तृतीयपंथी खेळाडू ठरणार आहे. २०२४च्या महिला ट्वेन्टी-२० विश्वचषकाच्या पात्रता स्पर्धेसाठी मगेहीचा कॅनडाच्या संघात समावेश करण्यात आला. २९ वर्षीय मगेही सलामीची फलंदाज असून लिंगबदलाचे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) पात्रता निकष तिने पूर्ण केले आहेत.

पात्रता स्पर्धा ४ ते ११ सप्टेंबर या कालावधी लॉस एंजलिस येथे खेळवली जाणार आहे. कॅनडाचा संघ अर्जेटिना, ब्राझील आणि अमेरिका यांच्याविरुद्ध आयसीसी अमेरिकास पात्रता स्पर्धेत खेळणार आहे. यातील विजेता संघ जागतिक पात्रता स्पर्धेत खेळेल.



**पनवेल : तायक्कांदो स्पर्धेत उत्तम कामगिरी करीत सुवर्णपदक पटकाविल्याबद्दल मयुरेश राम घरत याचा उत्तर भारतीय सेल व हनुमान मंदिर समिती उलवे नोड यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे व अन्य मान्यवर उपस्थित होते.**

















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com